अहवाल क्रमांक : १६४

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या धुळे जिल्हा परिषदेच्या सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत**

# अठरावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१८

# पंचायती राज समिती

(२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या धुळे जिल्हा परिषदेच्या सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

# अठरावा अहवाल

## पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(८) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(५) श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिति
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिति प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१४. ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची "कार्यकारी समिती प्रमुख " म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती

**(सन २०१५-२०१६)**

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

# प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून  पंचायती राज समितीचा अठरावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत नि:पक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो  परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ  शकणार  नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधिमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र  योजना  अस्तित्वात  आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशिलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दिष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरूरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरीतीने

साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-०९ व सन २०११-१२ या वर्षाच्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-१६ साठी गठीत झालेल्या समितीने धुळे जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने धुळे जिल्हा परिषदेस दिनांक ५, ६ व ७ जुलै, २०१७ रोजी भेट देऊन श्री. गंगाथरन डी., मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १५ व १६ मे, २०१८ रोजी जिल्हा परिषद, धुळे संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. श्याम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (अतिरिक्त कार्यभार), श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. र. प्र. आटे, सह सचिव,

शालेय शिक्षण विभाग, श्री.  ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.  ता. मा. कोळेकर, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्रीमती स्मिता निवतकर, उप सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.  संतोष कराड, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.  व्ही. जी. देशमुख, अवर सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.  पां. रा. खोटरे, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्रीमती स्वाती नानए, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.  आ. ना. मोंडवे, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.  उ. मा. कावडे, उप संचालक, ग्रामविकास विभाग, डॉ. पल्लवी दराडे, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, श्री.  नितीन देवरे, सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, श्री.  संजीव कांबळे, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, तसेच श्री.  प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या धुळे जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २७ नोव्हेंबर, २०१८.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | पर्यावरण संतुलित ग्रामसमृध्दी योजना सन २०११-१२ अंतर्गत ग्रामपंचायतींना रस्त्यावर सौर पथदिवे आस्थापित करण्याबाबतची अनियमितता (सन २०११-१२) | ३.१० | १ |
| (२) | दोन | ग्रामपंचायत/जवाहर रोजगार योजना/जवाहर ग्रामसमृध्दी योजना/संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना अपहार प्रकरणांबाबत (सन २०११-१२) | ३.११/६ | ७ |
| (३) | तीन | शासनमान्य अनुदानित वसतीगृहांचे प्रस्ताव मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत (सन २०११-१२) | ३.५८६ | ११ |
| (४) | चार | जिल्हा परिषदमधील अपूर्ण स्थितीतील बांधकामे (सन २००८-०९) | ३.१०३६/ १०/४४ | १३ |
| (५) | पाच | पानखेडा (गावठाणपाडा), ता. साक्री येथील पाणीपुरवठा योजना कामातील अनियमितता (सन २००८-०९) | ३.४७१/३/५ | १८ |
| (६) | सहा | पुरक पोषण आहार, अंगणवाडी सेविका/मदतनीस मानधन इत्यादीबाबत निधीच्या आहरण व संवितरण तसेच लेखांकनातील अनियमितता तसेच शिक्षकांनी अपंगत्वाचे दाखले घेऊन शासनाची फसवणूक केल्याबाबत (सन २००८-०९) | ४.३१०/३ | २२ |
| (७) | सात | लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणेबाबत (सन २००८-०९ व सन २०११-१२) | | २९ |
| (८) | आठ | सर्वसाधारण शिफारशी | | ५१ |
| | | **परिशिष्ट - अ, ब**<br>**समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | | ५५ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, धुळे

## पर्यावरण संतुलित ग्रामसमृध्दी योजना सन २०११-१२ अंतर्गत ग्रामपंचायतींना रस्त्यावर सौर पथदिवे आस्थापित करण्याबाबतची अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ३.१० (सन २०११-१२)**

सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील ग्रामीण भागात सध्याचा वीजपुरवठा लक्षात घेता ग्रामीण भागाला पर्यावरण संतुलित प्रणित मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने भारनियमन टाळून अपारंपारिक स्त्रोतातून निर्मित विजेचा पुरवठा विना व्यत्यय व्हावा या दृष्टीने ग्रामीण भागातील रस्त्यांवर सौर दिव्याचे खांब आस्थापित करणेबाबत ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक व्हीपीएम. सौरऊर्जा/२०११/प्र.क्र.५९ दिनांक, ३१ मार्च, २०११ अन्वये जिल्ह्यातील १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ४८ पात्र ग्रामपंचायतींना प्रत्येकी ३ सौरदिवे या प्रमाणे गट निहाय सौर दिव्यांची संख्या निश्चित केली आहे. त्याकरीता शासन हिस्स्यांची रक्कम रुपये १२,९६,००० उपलब्ध करून दिलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत:---

(१) पुरवठा आदेश देताना विभागाने पुरवठादारांशी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. ZPA२००९/प्र.क्र.५१४/वित्त-१, दिनांक २० ऑक्टोबर, २००९ अन्वये प्रथम १० लाखांसाठी रुपये १०० व त्यापुढील प्रत्येक लाखांसाठी १०० या प्रमाणे रुपये २१०० च्या मुद्रांक पेपरवर करारनामा केलेला नाही.

(२) सदर योजनेच्या प्रस्तावित ४८ ग्रामपंचायतीच्या १४४ सौर दिव्यांसाठी प्रतिनग रुपये २०,५००/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये २९,५२,००० रुपये एवढ्या रकमेच्या खरेदीसाठी पुरवठादार पर्ल एन्टरप्राईजेस, पुणे यांना पुरवठा आदेश दिला आहे. त्याअनुषंगाने दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर सौरदिवे आस्थापित करण्याची कार्यवाही करणे आवश्यक होते. तथापि, नस्तीचे अवलोकनात विभागाने पुरवठादाराला दिलेले पत्र क्र. जिपधु/ग्रापं-११/२४०/१२ दिनांक ५ जुलै २०१२ अन्वये एकाही ग्रामपंचायतीचे दिवे आस्थापित केले नसल्याचे नमूद आहे. त्याअनुषंगाने पुरवठादाराने पुरवठा आदेशातील विहित अटी शर्तीप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

(३) अट क्रमांक ९ नुसार पुरवठादाराने एकूण कामाच्या १०% प्रमाणे म्हणजे रक्कम रुपये २,९५,२००/- एवढ्या रकमेची बँक गॅरंटी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., धुळे यांच्या नांवे ५ वर्षांच्या कालावधीसाठी घेणे आवश्यक असताना ती घेतलेली नाही.

(४) पुरवठा आदेशातील अट क्रमांक ४ अन्वये काम पूर्ण झाल्यानंतर सौरदिवे कार्यान्वीत ठेवण्याच्या दृष्टीने संबंधित ग्रामपंचायतींच्या प्रतिनिधींना पथदिवा वापराच्या दैनंदिन देखभालीबाबत प्रशिक्षण देणे पुरवठादारास बंधनकारक असताना सदर बाबतचा अहवाल आढळून आलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांच्याकडील शा. नि. क्र. २०११/प्र.क्र.५९/पंरा-९, दिनांक ३१ मार्च, २०११ नुसार मे.पर्ल एन्टरप्रायजेस, पुणे या पुरवठादाराची निवड करण्यात आली होती. पुरवठादारास आदेश देताना रु.२१०० च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करून घेण्यात आलेला नव्हता. फक्त १०० रुपयांच्या मुद्रांक पेपरवर करारनामा केला होता. तद्नंतर रुपये २००० च्या कमी मुद्रांकांची रक्कम पुरवठादार यांना देय रकमेतून प्रमाणक क्र. २९३, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१५ अन्वये कपात करण्यात आली आहे.

(२) मे.पर्ल एन्टरप्राइजेस, पुणे यांना पुरवठा आदेशात नमूद केल्याप्रमाणे सौर पथदिवे बसविणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु संबंधीत पुरवठादार यांनी विहित मुदतीत दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर सौर पथदिवे आस्थापित केलेले नाहीत. तद्नंतर सन २०१२/१३ या वर्षात संबंधित एजन्सीने जिल्ह्यातील १३ ग्रामपंचायतींमध्ये एकूण ३९ सौरपथदिवे बसविले आहेत. मुदतीत काम न केल्यामुळे एजन्सीने पुरवठा आदेशातील अट क्र.८ चा भंग केला असल्याने दंड रक्कम रुपये २,१५,२५० आकारण्यात आलेला

होता. त्यापैकी रु.१,४९,५०० देय रकमेतुन कपात करून जिल्हा फंडात जमा करण्यात आलेली आहे. उर्वरीत दंडाची वसूलपात्र रक्कम रुपये ६५,७५० भरणेबाबत एजन्सीला नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.

(३) संबंधीत पुरवठादार यांना बँक गॅरंटी करून सादर करणेबाबत दिनांक १ डिसेंबर, २०१२ अन्वये नोटीस देण्यात आली होती. परंतु संबंधित पुरवठादार यांनी बँक गॅरंटी करून न दिल्यामुळे पुरवठादाराचे नांव काळ्या यादीत टाकणेबाबत या कार्यालयाचे आदेश क्र.धुजिप/ग्रापं/ ११/सौऊदि/४४/२०१४ दिनांक २४ डिसेंबर, २०१४ व दिनांक २१ जानेवारी, २०१७ नुसार शासनास अहवाल सादर करण्यात आला आहे. तसेच मे.पर्ल एन्टरप्रायझेस, पुणे या पुरवठादाराकडून बँक गॅरंटी का घेण्यात आली नाही याबाबत तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खुलासा मागविण्यात आला असून त्यांनी बँक गॅरंटी करून देणेबाबत संबंधीत एजन्सीला यापूर्वी कळविले आहे असे खुलाशात नमूद केले आहे.

(४) धुळे व शिरपूर तालुक्यातील ग्रामपंचायतींना सौर पथदिवे बसविताना ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. त्याबाबत ग्रामसेवकांचे दाखले घेण्यात आले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सौर पथदिवे पुरवठादारांकडून दंडाची थकीत रक्कम रूपये ६५,७५० केव्हा पर्यंत वसूल करण्यात येणार आहे, बँक गॅरंटी घेतली असती तर थकीत रक्कम वसूल करता आली असती ती न घेतल्याबाबत कोणती प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली आहे, बसविलेले सौर दिवे किती दिवस कार्यरत राहिले, थकीत रक्कम किती आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, एकूण १३ ग्रामपंचायतींमध्ये ३९ सौर पथदिवे बसविले आहेत. पुरवठा आदेशातील अटीचा भंग केल्यामुळे रूपये २,१५,२५० इतक्या रकमेचा दंड आकारण्यात आला होता. त्यापैकी रुपये १,४९,५०० इतकी रक्कम देय रकमेतून कपात करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम रूपये ६५७५० इतकी रक्कम वसूल करण्यासाठी नोटीस देण्यात आलेली आहे, बँक गॅरंटी घेतली नसल्यामुळे कारवाई सुरू आहे. एकूण रूपये १,४९,५००.०० इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. थकीत रक्कम रूपये ६५७५० इतकी आहे. पुरवठादाराला बँक गॅरंटी सादर करण्यासाठी नोटीस देण्यात आली होती. परंतु, पुरवठादाराने बँक गॅरंटी न दिल्यामुळे त्याचा समावेश काळ्या यादीत करण्यात आला आहे. मे.पर्ल एन्टरप्रायझेस, पुणे येथून पुरवठा झाला आहे.

यानंतर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, मे.पर्ल एन्टरप्रायझेस, पुणे येथून पुरवठा होणार असल्याबाबतचे ग्रामविकास विभागाचे पत्र होते. ४८ ग्रामपंचायतींच्या १४४ सौर दिव्यांसाठी ३१४४ नगांची मागणी एजन्सीला दिनांक २३.०२.२०१२ रोजी सादर करण्यात आली होती. ५० टक्के रक्कम संबंधित कंपनीला आगाऊ द्यायची होती. त्यानुसार ५० टक्क्यांप्रमाणे रूपये १२ .९६ लक्ष प्राप्त झाले होते. सदर रक्कम कंपनीला देण्यात आली. त्याप्रमाणे १४४ पथदिवे दिनांक ३१ मार्च, २०१२ पूर्वी स्थापित करणे आवश्यक होते. तथापि, सदर सौर पथदिवे बसविण्याबाबत संबंधित एजन्सीकडे पाठपुरावा करून देखील दिनांक ३१ मार्च, २०१२ पूर्वी बसविण्यात आले नाहीत. आपण सुरुवातीला जेवढे पैसे दिले होते तेवढेच सौरदिवे बसविण्यात आले. सन २०१२-१३ मध्ये धुळे जिल्ह्यातील १३ ग्रामपंचायतींमध्ये ३९ सौरदिवे बसविण्यात आले आहेत. वस्तुत: ४८ ग्रामपंचायतीमध्ये १४४ सौरदिवे बसविणे आवश्यक होते.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषद बँक हमीशिवाय अग्रिम देऊ शकत नाही. एका दिव्याची किंमत काय होती, निविदेच्या अटी आणि शर्थीच्या संदर्भात अधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावयास पाहिजे. ठेकेदारांना अग्रिम देतो तर त्यासंदर्भात बँक हमी घेतली गेली पाहिजे.

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, एका दिव्याची किंमत रूपये २०,५०० इतकी होती. ४८ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ३ याप्रमाणे १४४ पथ दिवे बसविण्याची शासनाची सूचना होती. ग्रामपंचायतींच्या रस्त्यावर सौर दिवे बसविण्यासंबंधातील शासनाचा दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० रोजीचा शासन निर्णय आहे. त्यात नमूद करण्यात आले आहे की, "मंजूर अनुदानाच्या ५० टक्के रक्कम जिल्हा परिषदेमार्फत संबंधित संस्थेस वितरित करण्यात येईल. सौर पथ दिवे उभारल्यानंतर व जिल्हा परिषदेने तसे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अनुदानाची उर्वरित ५० टक्के रक्कम वितरित केली जाईल" त्याप्रमाणे

५० टक्के रक्कम तात्काळ संबंधितांना वर्ग करण्यात आली आहे. शासन निर्णयात यासंदर्भात उल्लेख नाही परंतु आरसीमध्ये बँक गॅरंटीचा उल्लेख आहे.

तद्नंतर समितीने पुन्हा विचारणा केली की, ज्यांनी नियम तोडले आहेत अशांवर कारवाई होणे आवश्यक आहे. जे पैसे वसूल करावयाचे आहेत ते पैसे त्यांच्या देयकातून वसूल केले पाहिजे. त्यामुळे या प्रकरणातील ६५ हजार रुपयांची रक्कम संबंधितांकडून व्याजासहित वसूल केली पाहिजे. पाच वर्षांपासून ठेकेदारांकडून एक रुपयासुद्धा वसूल करण्यात आलेला नाही. तसेच ज्या अधिकाऱ्यांनी बँक हमी घेतली नाही अशा अधिकाऱ्यावर सुद्धा कारवाई होण्याची आवश्यकता आहे. यामध्ये अधिकाऱ्यांनी नियमाचे उल्लंघन केलेले आहे.

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे विदित केले की, संबंधिताकडून खुलासे मागवलेले असून यासंदर्भात दिनांक ४ जानेवारी,२०१७ रोजी नोटीससुद्धा पाठविलेली आहे. या उत्तरानंतर समितीने असे विचारले की, पंचायती राज समिती धुळे जिल्हा परिषदेला भेट देण्यासाठी येणार असल्यामुळे उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या प्रकरणात संबंधिताला नोटीस काढलेली आहे असे दिसते. जी नोटीस काढलेली आहे तशी नोटीस सन २०१२ ते २०१७ पर्यंत म्हणजे समिती येण्याच्या पाच वर्षांमध्ये का काढली नाही. धुळे जिल्हा परिषद युध्द पातळीवर काम करीत आहे असे समितीला भासवण्याचा धुळे जिल्हा परिषदेकडून प्रयत्न होत आहे. सन २०१२ ते २०१७ पर्यंत संबंधिताविरुध्द नोटीस का काढली नाही. धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एक महिन्यापूर्वीच या ठिकाणी रुजू झालेले आहेत. परंतु इतर अधिकारी बऱ्याच वर्षांपासून येथेच कार्यरत आहेत. धुळेजिल्हा परिषद ठेकेदाराला नोटीस देत असेल परंतु ठेकेदार नोटिसीला उत्तर देत नसेल असेही कारण असू शकेल. एजन्सीची नेमणूक जर शासन करते तर एजन्सी जिल्हा परिषदेला कशासाठी महत्व देईल, असाही विषय होऊ शकतो, जिल्हा परिषदेला या प्रकरणात पाच वर्षे थांबण्याची काय गरज होती, जिल्हा परिषदेने संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा का दाखल केला नाही, गेल्या पाच वर्षांत संबंधिताला आपण किती वेळेस नोटीसेस दिलेल्या आहेत. ज्या अधिकाऱ्यांच्या काळात हे प्रकरण घडलेले आहे त्या अधिकाऱ्यांनी समिती समोर उपस्थित राहिले पाहिजे. संबंधित अधिकारी जर समिती समोर उपस्थित राहत नसतील तर तसे समितीला सांगा. या प्रकरणात ठेकेदारानेही काही केले नाही व या जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी देखील काहीही केलेले नाही. जिल्हा परिषद संबंधित ठेकेदाराला पैसे देऊन बसली असून यासंदर्भात पथदिव्यांची १० वर्षांची गॅरंटी आहे. जे पथदिवे बसवण्यात आलेले आहेत ते चांगले आहेत की, निकृष्ठ प्रतीचे आहेत हे बघण्याची जबाबदारी कोणाची आहे, शासनाचे परिपत्रक हे मार्गदर्शनासाठी असते. या ठिकाणी अधिकाऱ्यांनी केवळ शासनाचे परिपत्रक वाचून दाखवू नये तर शासनाच्या परिपत्रकाची अधिकाऱ्यांनी केलेल्या अंमलबजावणीचा उल्लेख केला पाहिजे.

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, संबंधित एजन्सीने पथदिवे न बसवल्यामुळे जिल्हा परिषदेने संबंधित एजन्सीला दिनांक ७.६.२०१२ तसेच दिनांक २७.६.२०१२ रोजी नोटीस दिलेली आहे. सदर नोटिसेसच्या प्रती ग्रामविकास विभाग तसेच उपायुक्त विभाग, नाशिक यांनाही दिलेल्या असून जिल्हा परिषदेने सदर ठेकेदाराला काळया यादीत टाकण्याच्या संदर्भात शासनाला प्रस्ताव सुद्धा पाठवलेला आहे.

यावर समितीने असे निदेश दिले की, संबंधित प्रकरणात गेल्या पाच वर्षात जिल्हा परिषदेने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. एका सौर पथदिव्याची २०,५०० रुपये किंमत जास्त आहे. त्यामुळे यामध्ये जे जबाबदार आहेत त्यांच्यावर देखील जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

तसेच ३१ मार्च २०११ रोजी जे सौर पथ दिवे बसविण्यात आले होते त्यासंदर्भातील शासकीय निर्णयातील परिच्छेद क्रमांक "ड" मध्ये एका सौर पथदिव्याची किंमत २०,९२२ रुपये दिलेली आहे. परंतु जिल्हा परिषदेने या सौर पथदिव्याची किंमत २०,५०० रुपये लावलेली आहे. सौर पथ दिव्यामध्ये जिल्हा परिषद, धुळे यांनी ४२२ रुपयांचा फायदा केलेला आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी विचारल्या प्रमाणे सदर ठेकेदाराला काळया यादीत टाकण्याची कार्यवाही शासनाकडून झालेली दिसून येत नाही.

कोणत्याही ठेकेदाराने पैसे बुडवले तर नियमाप्रमाणे संबंधित ठेकेदाराकडून ते पैसे व्याजासहीत वसूल करता येतात. तसेच सन २०१२ पासून जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली नाही, त्यामुळे याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व त्यानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी, सौर पथदिव्यांकरिता अग्रीम देण्यापूर्वी बँक हमी

घेतली गेली पाहिजे होती त्यामुळे २ महिन्यांच्या आत बँक हमी न घेण्याऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा तसेच संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणी पाठपुरावा करून संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले जाईल. संबंधित ठेकेदाराचे धुळे जिल्हा परिषदेत कोणतेही काम सुरु नाही. सदर ठेकेदाराचे कोणत्या जिल्हयात काम सुरू आहे याची माहिती घेऊन संबंधित ठेकेदाराकडून पैसे वसूल करण्यात येतील.

यावर समितीने असे निदेश दिले की, "एकूण कामांच्या १० टक्के प्रमाणे म्हणजे रक्कम रुपये २,९५,२००/- एवढया रक्कमेची बँक हमी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प., धुळे यांच्या नावे पाच वर्षांच्या कालावधीसाठी घेणे आवश्यक आहे" अशी लेखी माहिती दिली आहे. परंतु लेखी माहिती चुकीची देण्यात आलेली आहे. खरे म्हणजे अग्रिम देण्यापूर्वीच बँक हमी घेणे आवश्यक असते.

लेखी माहितीमध्ये असे म्हटले आहे की, "संबंधित पुरवठादार यांना बँक हमी सादर करणेबाबत दिनांक १ डिसेंबर २०१२ अन्वये नोटीस देण्यात आली होती. परंतु संबंधित पुरवठादाराने बँक हमी न दिल्यामुळे पुरवठादाराचे नाव काळया यादीत टाकणेबाबत या कार्यालयाने दि.२४ डिसेंबर, २०१४ व दि. २१ जानेवारी, २०१७ नुसार शासनास अहवाल सादर करण्यात आला आहे." असे असताना मे.पर्ल एन्टरप्रायझेसवर शासनाने कोणतीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही. बँक हमी घेतली असती तर संबंधित बँकेकडून हे पैसे व्याजासह वसूल करता आले असते. जर सदर ठेकेदार पैसे देत नसेल तर सदर ठेकेदारावर जिल्हा परिषदेने फौजदारी कारवाई प्रस्तावित करणे आवश्यक आहे. ज्या जबाबदार अधिकाऱ्यामुळे ही दिरंगाई झालेली आहे त्या अधिकाऱ्यावर सुद्धा कारवाई झाली पाहिजे.

पंचायती राज समितीने सन २०११-१२ व सन २००८-०९ चे लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल विचारात घेतले असल्यामुळे ही बाब उघड झाली आहे. लेखा परीक्षकाने घेतलेल्या आक्षेपावर पुर्तता करण्यासाठी लेखा परीक्षक तीन वेळा संधी देत असतात. तीन वेळा संधी दिल्यानंतरही पूर्तता केली नाही ही फार गंभीर बाब आहे. जिल्हा परिषदेने सबंधित ठेकेदारावर फौजदारी कारवाई केली तर हे पैसे जिल्हा परिषदेला मिळू शकतील.

सदरहू प्रकरणी बऱ्याच प्रमाणात अनियमितता झालेली आहे. सदरहू विषयासंदर्भात समितीच्या सन्माननीय सदस्यांनी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरातून समितीचे समाधान झालेले नाही. समितीने धुळे जिल्ह्याचा दौरा आयोजित केल्याचे कळविल्यानंतर सदरहू प्रकरणी थोड्या फार प्रमाणात कार्यवाही करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. सदरहू प्रकरणी मागील ४ ते ५ वर्षांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, त्यामुळे समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली:---**

मे.पर्ल एन्टरप्रायझेस, पुणे यांच्याकडून ४८ ग्रामपंचायतींच्या १४४ सौर दिव्यांसाठी ३१४४ दिव्यांची मागणी असतांना ५० टक्के रुपये १२.९६ लक्ष रक्कम कंपनीला आगाऊ देण्यात आली होती. परंतु सदरहू एजन्सीने विहित मुदतीत सौरदिवे न बसविल्यामुळे त्यांचे विरुध्द नियमानुसार कोणती कारवाई करण्यात आली ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :---**

धुळे जिल्ह्यातील १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ४८ ग्रामपंचायतींना १४४ सौरपथदिवे बसविण्यासाठी शासनाकडून १२.९६ लक्ष रुपयांचे अनुदान उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यापैकी रुपये ६,४८,००० मात्र अग्रीम सदर कंपनीस अदा केले होते. सदर एजन्सीने फक्त ३९ सौरपथदिवे बसविलेले होते व पुरवठा आदेशात नमूद केल्याप्रमाणे विहित कालावधीत सौरपथदिवे बसविण्यात आले नाहीत, म्हणून सदर एजन्सीस रुपये २१,३५,२५० दंड आकारण्यात आला होता. त्यापैकी रुपये १,४९,५०० सदर एजन्सीकडून व रु.६५,७५० तत्कालीन कार्यरत असलेले श्री. एस. व्ही. धोत्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) यांचेकडून असे एकूण रु.२,१५,२५० दंड वसूल करण्यात आला आहे.

तसेच या कार्यालयाचे पत्र क्र.जिपधु/ग्रा.पं/११/५८/२०१७ दिनांक २१ जानेवारी, २०१७ नुसार एजन्सीने विहित कालावधीत नेमून दिलेले काम पूर्ण न कल्यामुळे मे.पर्ल एन्टरेप्रायझेस, पुणे या एजन्सीस काळ्या यादीत टाकण्याबाबत अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी स्मरणपत्र देण्यात आले आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (योजना-१) जिल्हा परिषदेकडून कार्यवाही करण्यात येत आहे. मे.पर्ल एन्टरप्रायजेस, पुणे यांना काळ्या यादीत टाकण्यासंबंधी विभागाकडून महाऊर्जा पुणे यांचेकडे शिफारस करण्यात आली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने धुळे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १५ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पर्यावरण संतुलित ग्रामसमृध्दी योजना सन २०११-१२ अंतर्गत ग्रामपंचायतींना रस्त्यावर सौर पथदिवे आस्थापित करण्याबाबतच्या अनियमिततेप्रकरणी कार्यवाही पूर्ण केली आहे काय, यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या प्रकरणी कार्यवाही पूर्ण केली आहे. दंड वसूल केला आहे. यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, दंड वसूल केला ते ठीक आहे. पण पुरवठादार एजन्सीला काळ्या यादीमध्ये टाकण्यासंबंधी कार्यवाही केली आहे किंवा कसे, कारण दंड वसूल केला म्हणजे त्या एजन्सीने गुन्हा केला असल्याचे सिध्द झाले आहे. या एजन्सीला काळ्या यादीमध्ये टाकण्यासंबंधी अहवाल आला आहे. मात्र अजूनही त्यासंबंधी कार्यवाही झाली नाही.

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, पुणे येथील महाऊर्जा कार्यालयाकडे तशी शिफारस केली आहे. आम्ही त्यांना विनंती करु की त्यांनी यासंबंधी १५ ते २० दिवसात निर्णय घ्यावा. पुण्यामध्ये मेडा म्हणजे महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण आहे. त्यांच्याकडे पॅनेल असेल आणि त्यामुळे त्यांच्याकडे या प्रकरणी तशी शिफारस केली आहे की, या एजन्सीला काळ्या यादीत टाकावे. विभागाकडून त्यासंबंधी आता पाठपुरावा करतो. त्यांच्याकडे पाठपुरावा करून महिना अखेरपर्यंत ही कार्यवाही करून घेतो.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांची कार्यवाही वेळेवर केली होती. या प्रकरणी विभागाकडून थोडासा उशीर झाला आहे. त्याबद्दल विभागाकडून दिलगिरी व्यक्त करतो. मात्र आता त्या विभागाने शिफारस केलेली आहे. पुढील एक महिन्यामध्ये त्याचा पाठपुरावा करून कार्यवाही करण्यात येईल. कारण त्यांनी या एजन्सीला इम्पॅनेल केले असेल. त्यामुळे त्यांची काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही परिणामकारक राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तसे केले तर ते एका जिल्ह्यासाठी होईल आणि त्यांनी जर ही कार्यवाही केली तर ती एजन्सी संपूर्ण राज्यासाठी काळ्या यादीत टाकण्यात येईल. त्यामुळे महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण, पुणे यांनी त्यांना काळ्या यादीत टाकणे योग्य राहील. एका महिन्यात विभागाकडून ही सर्व कार्यवाही करून घेतो. या काळात विभाग त्याचा पाठपुरावा करेल आणि त्याबाबत काही त्रुटी असतील तर त्यांची पुर्तता करून घेईल आणि या प्रकरणी संबंधित एजन्सी आधीच दोषी असल्याचे सिध्द झाल्यामुळे विभागाला खात्री आहे की, त्याबाबत महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण, पुणे निर्णय घेईल. पण त्यांनी त्यांचा अंतिम निर्णय १ महिन्याच्या आतमध्ये घेण्यासाठी विभाग त्यांना विनंती करेल.

यानंतर समितीने असे निदेश दिले की, विभागाने या प्रकरणी १ महिन्यात पाठपुरावा करून कार्यवाही करून घ्यावी व तसा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत पर्यावरण संतुलित ग्रामसमृध्दी योजना सन २०११-१२ मध्ये ग्रामपंचायतींना रस्त्यावर सौर पथदिवे आस्थापित करण्यात आले होते. ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ३१ मार्च, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार धुळे जिल्ह्यातील १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ४८ पात्र ग्रामपंचायतींना प्रत्येकी ३ सौरदिवे या प्रमाणे गटनिहाय सौर दिव्यांची संख्या निश्चित करण्यात आलेली होती. त्याकरिता शासन हिस्स्यांची रक्कम रुपये १२,९६,०००/- उपलब्ध करून देण्यात आलेली होती. पुरवठादाराने विहित मुदतीत दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर सौरपथदिवे आस्थापित न केल्यामुळे पुरवठा आदेशातील अट क्र.८ नुसार रुपये २,१५,२५०/- एवढा दंड पुरवठादाराला आकारण्यात आला होता, त्यापैकी रुपये १,४९,५००/- देय रकमेतून कपात करून जिल्हा फंडात जमा केले, उर्वरित रुपये ६५,७५०/- जमा केलेले नव्हते. उर्वरित रक्कम दिनांक २३ फेब्रुवारी, २०१५ रोजी पुरवठादाराला देय असलेल्या रकमेतून वजा करण्यात आली आहे. मे.पर्ल एन्टरप्रायझेस, पुणे या सौरपथदिवे पुरवठा करणाऱ्या पुरवठादारांकडून रुपये २०००/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करून न घेता फक्त १०० रुपयांच्या मुद्रांक पेपरवर करारनामा केला होता.

संबंधित पुरवठादाराने बँक हमी करून न दिल्याप्रकरणी पुरवठादाराचे नाव काळ्या यादीत टाकणेबाबत शासनाकडे अहवाल सादर करण्यात आला आहे. याप्रकरणी पुरवठादारकडून बँक हमी न घेणाऱ्या तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. **गत ५ वर्षांमध्ये जिल्हा परिषदेने कोणतीही कार्यवाही केलेली नाही तसेच मे. पर्ल एंटरप्रायजेस या पुरवठादाराला काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही शासनाकडूनही झालेली असल्याचे दिसून येत नाही. शासनाचे पैसे नियमाप्रमाणे वसूल न झाल्यास ती रक्कम व्याजासहित वसुल करणे आवश्यक आहे. तथापि, सन**

२०१२ या वर्षापासून संबंधित अधिकाऱ्यांनी रक्कम वसुली बाबत कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच संबंधित पुरवठादारास सौर पथ दिव्याकरीता अग्रीम रक्कम देण्यापूर्वी बँक हमी घेणे आवश्यक होते तसेच करारनामा रुपये २१००/- च्या मुद्रांक पेपरवर न करता केवळ १००/- रुपयांच्या मुद्रांक पेपरवर करून घेण्याची अक्षम्य चूक सुरूवातीला झालेली असल्याचे दिसून येते. सबब, उपरोक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तसेच मे.पर्ल एंटरप्रायजेस या पुरवठादारास महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण, पुणे व ग्रामविकास विभागाने काळ्या यादीत टाकावे व याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, धुळे

## ग्रामपंचायत/जवाहर रोजगार योजना/जवाहर ग्रामसमृध्दी योजना/संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना अपहार प्रकरणांबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.११/६ (सन २०११-१२)**

सन २०११-१२ (परिच्छेद क्र.६) सामान्य प्रशासन विभागाने ग्रामनिधी / जरोयो/जवाहर ग्रामसमृध्दी योजना/संपुर्ण ग्रामीण रोजगार योजनांमध्ये माहे मार्च, २०१२ अखेर शिल्लक अपहार प्रकरणे व गुंतलेल्या रक्कमांचा सादर केलेला तपशील व स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालयात ठेवण्यात आलेल्या नोंदवहीनुसार शिल्लक अपहार प्रकरणे व गुंतलेल्या रक्कमा यात तफावत आहे. ग्रामपंचायत विभागाने दिलेल्या विवरणपत्र क्र.५ प्रमाणे शिल्लक प्रकरणे १९४ व गुंतलेली रक्कम रुपये १,६१,२६,७००/- व स्थानिक निधी लेखापरिक्षा विभागाकडील नोंदवहीनुसार शिल्लक प्रकरणे १९३ व गुंतलेली रक्कम रुपये १,६०,३०,५६४/- असल्याने शिल्लक प्रकरणाबाबत १ ने व गुंतलेल्या रक्कमेबाबत रुपये ९६,१३६/- ही तफावत आढळून येते.

उपरोक्त तफावतीबाबत जिल्हा परिषदेने ताळमेळ घेणे आवश्यक आहे. स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालयाकडून ग्रामपंचायत अफरातफरीबाबतची प्रकरणे जिल्हा परिषदेकडे पाठविली जातात त्यानुसार जिल्हा परिषदेकडून परिच्छेद निकाली काढण्याची कार्यवाही केली जाते. परंतु सन २०११-१२ मध्ये जिल्हा परिषदेने एकही प्रकरण निकाली काढलेले नाही, त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये शासनाचा मोठा निधी गुंतून पडलेला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

ग्रामपंचायत विभाग व स्थानिक निधी लेखा परिक्षा विभाग, धुळे यांच्याकडील अपहार प्रकरणांच्या नोंदवहीचा मेळ घेण्यात आला असून स्थानिक निधी लेखा विभागाकडील नोंदवहीनुसार ग्रामपंचायत विभागाचे रजिस्टर अदययावत करण्यात आले असून त्याप्रमाणे नोंदी घेण्यात आल्या आहेत. सन २०११-१२ या वर्षाअखेर १९३ प्रकरणे असून त्यात रुपये १,६०,३०,५६४/- इतकी रक्कम गुंतलेली आहे.

सन २०११-१२ या वर्षात अपहार प्रकरणांची पुर्तता करण्यात आली नाही. तथापि, पुढील वर्षात कार्यवाही करण्यात आली आहे ती पुढीलप्रमाणे, सन २०११-१२ अखेर एकूण १९३ प्रकरणे प्रलंबित होती. त्यापैकी ५० प्रकरणे निकाली काढलेली असून त्या प्रकरणांमधून रु.३९,५६,६५७/- मात्र वसुल करण्यात आले आहेत.

| वर्ष | एकूण प्रलंबित | | निकामी काढलेले | | शिल्लक | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रकरणे | रक्कम | प्रकरणे | वसूल रक्कम | प्रकरणे | रक्कम |
| २०११--१२ | १९३ | १,६०,३०,५६४ | ५० | ३९,५६,६५७ | १४३ | १,२०,७३,९०७ |

शिल्लक प्रकरणांचा व गुंतलेल्या रकमांचा गोषवारा

| शिल्लक प्रकरणे | | संशयीत अपहार रक्कम | कायम अपहार रक्कम | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्रकरणे | रक्कम | | | |
| १४३ | १,२०,७३,९०७ | ८४,४२,८९५-/ | ३६,३१,०१२ | १,२०,७३,९०७ |

वरील १४३ प्रलंबित प्रकरणांपैकी ०४ प्रकरणात मा.न्यायालयात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यात रु.७,१६,८७०/- मात्र रक्कम गुंतलेली आहे. अफारातफर प्रकरणांची पुर्तता करण्याचे काम सुरू असून गट विकास अधिकारी तसेच विस्तार अधिकारी (ग्रापं) पंचायत समिती सर्व यांना दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३, १९ ऑगस्ट, २०१४, २४ नोव्हेंबर, २०१४, १२ जानेवारी,

२०१५, २८ जुलै, २०१५ व ३१ मार्च २०१६ अन्वये या कार्यालयाकडून पत्र व्यवहार करून जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढणेबाबत कळविण्यात आले आहे. या कार्यालयाचे पत्र क्र. जिपधु/ग्रापं/परास/६३७/२०१६ दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ अन्वये एकूण १० विस्तार अधिकारी (ग्रापं) यांना कारणे दाखवा नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत व ०४ विस्तार अधिकारी (ग्रापं) यांनी अपहार प्रकरणे निकाली काढण्यात अक्षम्य दुर्लक्ष केल्यामुळे त्यांच्या विरुद्ध परिशिष्ट १ ते ४ भरून विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. तसेच दिनांक ७ नोव्हेंबर, २०१६, ११ नोव्हेंबर, २०१६ व १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी या कार्यालयाकडून ग्रामनिधीच्या अपहार प्रकरणात असलेल्या ग्रामसेवकांना कारणे दाखवा नोटीसा दिलेल्या आहेत व वसुलीचा पाठपुरावा चालू आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामपंचायत / जवाहर रोजगार योजना/ जवाहर ग्रामसमृध्दी योजना / संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना अपहार प्रकरणांतील वसुलीबाबत कोणते नियोजन करण्यात आले आहे, १४३ प्रकरणांतील १,२०,७३,९०७ रुपये ही रक्कम प्रदीर्घ काळ वसूल न करण्याची कारणे काय आहेत, सदरहू प्रकरणे कोणत्या वर्षांपासून प्रलंबित आहेत.

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) यांनी खुलासा केला की, विविध योजनेतील अपहार प्रकरणातील १,२०,७३,९०७ रुपये रक्कम वसूल होणे अपेक्षित आहे. सदरहू प्रकरणाचा अहवाल विधिमंडळास सादर केल्यानंतर १२ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली असून १३१ प्रकरणातील १ कोटी २० लाख रुपये रक्कमेची वसुली शिल्लक आहे. प्रलंबित प्रकरणांपैकी ४ प्रकरणात मा.न्यायालयात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यात ७,१६,८७० रुपये रक्कम गुंतलेली आहे. उर्वरित अफरातफर प्रकरणे निकाली काढणे व वसुली करणेबाबत जिल्हास्तरावरुन गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत), पंचायत समिती यांना अनेक वेळा पत्र व्यवहार करून कळविण्यात आले आहे. तसेच, उक्त प्रकरणी कामकाजामध्ये दिरंगाई केल्याप्रकरणी १० विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. सदरहू प्रकरणी तालुकास्तरावर वसुलीचा पाठपुरवा सुरु आहे. सन १९६३ पासूनची सदरहू प्रकरणे प्रलंबित आहेत.

यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, शासनाने अफरातफरीच्या रकमांच्या वसुली संदर्भात एक धोरण ठरविले आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेड यांनी एक महिन्यामध्ये ५० कोटी रुपये रक्कम वसूल केली आहे. नांदेड व पुणे येथील अफरातफरीची रक्कम वसूल करण्यासाठी संबंधितांना फौजदारी खटले दाखल करण्याची नोटीसा देण्याची सूचना केल्यामुळे तेथील वसुलीची रक्कम मोठ्या प्रमाणात जमा झाली. ज्यांनी वसूलपात्र रक्कम जमा केली नाही त्यांची वेतनवाढ रोखण्याबाबत शासनाने शासन निर्णय निर्गमित केला आहे. धुळे जिल्हा परिषदेने देखील अफरातफरीची रक्कम वसूल करण्यासाठी विशद केलेल्या कार्यवाहीचे पालन केले तर वसूलपात्र रक्कम वसूल होईल.

यानंतर समितीने विचारणा केली की, वसुलीच्या संदर्भात सदरहू कार्यवाही जिल्हा परिषदेने केली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याप्रकरणी विभागीय चौकशी सुरु केली आहे असे सांगितले. या खुलाशावर समितीने विभागीय चौकशीमध्ये वेळेचा खूप अपव्यय होतो. शासन निर्णयानुसार सदरहू प्रकरणी संबंधितांची वेतनवाढ थांबविणे शक्य आहे. मागील ४-५ वर्षांच्या काळामध्ये किती रक्कम वसूल करण्यात आली ? सदरहू योजना जेव्हापासून सुरु झाल्या तेव्हापासून अपहाराची प्रकरणे वाढली आहेत. सदरहू प्रकरणे निदर्शनास आलेली असून निदर्शनास न आलेली अनेक प्रकरणे असू शकतात. त्याप्रकरणीही वसूली झाली पाहिजे असे मत व्यक्त केले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू वसुलपात्र प्रकरणातील १४ कर्मचारी मयत झाले आहेत असे नमूद केल्यानंतर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) यांनी खुलासा केला की, समितीने दिलेल्या सूचनांनुसार संबंधित कार्यरत कर्मचारी यांचेकडून वसूलीच्या संदर्भात कार्यवाही करण्यात येईल. उक्त प्रकरणातील ग्रामपंचायतीकडून २०००, ८००, ३७१ रुपये अशा प्रकारची वसूलपात्र रक्कम येणे आहे, सदरहू रक्कम २ महिन्यांच्या आत वसूल करण्यात येईल. ज्या प्रकरणामध्ये खर्च केलेल्या पैशांचे रेकॉर्ड नसते, अशी प्रकरणे कायमस्वरुपी अपहारातील प्रकरणे समजण्यात येतात.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, शासकीय अपहार, गैरव्यवहारांची प्रकरणे तपासण्यासाठी शासनाने लाचलुचपत प्रतिबंधक खाते स्वतंत्र निर्माण केले आहे, त्यांचे सहकार्य घेतले आहे काय, कायम अपहाराची रक्कम ३६,३१,०१२ रुपये इतकी असून त्यासंदर्भात पोलिसांना कळविण्यात आले आहे काय ? सदरहू प्रकरणी कळविले नसेल तर तो देखील गुन्हा आहे. कायम स्वरुपी अपहार झाल्याचे सिद्ध झालेले असतानाही पोलिसांना कळविले नाही काय तसेच किरकोळ रकमांची वसूली संबंधित कर्मचारी यांच्या वेतनातून करण्यात यावी आणि अफरातफरीच्या उक्त शिल्लक प्रकरणातील किती कर्मचारी मयत झाले आहेत व किती कार्यरत आहेत त्यांची माहिती समितीला सादर करावी.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू प्रकरणांतील बरेच कर्मचारी मयत झाले आहेत. उक्त प्रकरणातील किरकोळ रकमांची वसुली करण्यात येईल. तसेच जिल्हा परिषदेने काही प्रकरणाबाबत संबंधितांची विभागीय चौकशी सुरु केली आहे. तद्नंतर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) यांनी खुलासा केला की, अफरातफरीची एकूण १९३ प्रकरणे होती त्यामध्ये १३६ ग्रामसेवक गुंतलेले होते, त्यापैकी ४४ कर्मचारी मयत झाले आहेत. सदरहु प्रकरणी सन १९६३ पासूनची आहेत.

यावर समितीने असे निदेश दिले की, अफरातफरीच्या प्रकरणातील वसुलीच्या संदर्भात दिरंगाई होत असल्याबाबत समितीच्या सन्माननीय सदस्यांचा रोष आहे. सदरहु प्रकरणांची रितसर चौकशी करून दंडाची रक्कम वसूल करण्यात आली नाही, हा देखील गुन्हाच आहे. जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, किरकोळ रकमांची वसुली २ महिन्यांत करून समितीला अहवाल सादर करतो. सदरहु अहवाल विभागाच्या सचिवांच्या साक्षीच्या वेळी सादर करण्यात यावा. उक्त प्रकरणातील दंडाची रक्कम वसूल करण्यासंदर्भात त्वरित कार्यवाही करावी व दंडाची रक्कम वसूल करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) अपहार प्रकरणात १,२०,७३,९०७ रुपये रक्कम वसूल होणे अपेक्षित असतांना केवळ १२ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून १३१ प्रकरणातील १ कोटी २० लाख रुपये रक्कमेची वसूली न होण्याची कारणे काय आहेत, तसेच प्रलंबित प्रकरणांपैकी ४ प्रकरणे न्यायप्रविष्ठ असून त्यात रुपये ७,१६,८७० रक्कम गुंतलेली असणे, सदरहू दंडाची रक्कम वसूल करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

(२) कामकाजामध्ये दिरंगाई केल्याप्रकरणी १० विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) यांचेविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :---**

(१) ग्रामनिधीच्या १४३ अपहार प्रकरणात रुपये १,२०,७३,९०७ इतकी रक्कम वसूल होणे अपेक्षित आहे. त्यापैकी १४३ प्रलंबित प्रकरणांमधून ६० प्रकरणे निकाली काढण्यात आली असून त्यातून रुपये २६,६७,३८० इतकी रक्कम वसूल केलेली आहे. उर्वरित ८३ प्रकरणांमधून रुपये ९४,०६,५२७ वसूलीची कार्यवाही सुरु आहे. मयत ग्रामसेवक व न्यायप्रविष्ठ प्रकरणांमध्ये वसुलीस विलंब होत आहे.

(२) कामकाजात दिरंगाई करणाऱ्या १० विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) पैकी ०४ विस्तार अधिकारी यांचेविरुद्ध या कार्यालयाचे आदेश दिनांक ७ मे, २०१८ नुसार १ वेतनवाढ कायमस्वरुपी व ०६ विस्तार अधिकारी यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचा अभिप्राय :--** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने धुळे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १५ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामपंचायत/जवाहर रोजगार योजना/जवाहर ग्रामसमृध्दी योजना/संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना अपहार प्रकरणात १ कोटी २० लाख ७३ हजार रुपये इतकी रक्कम वसूल होणे अपेक्षित असताना केवळ १२ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून १३१ प्रकरणातील १ कोटी २० लाख रुपये इतक्या रकमेची वसुली झाली नव्हती. त्यामुळे या प्रकरणी वसुलीची सद्य:स्थिती काय आहे.

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, २६ लाख ६७ हजार रुपये इतकी रक्कम वसुली केलेली आहे. ९४ लाख रुपये वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे. काही बाबी न्यायप्रविष्ट असून फौजदारी कार्यवाही सुद्धा सुरू असल्यामुळे जवळजवळ ४३ लाख रुपये येणे बाकी आहेत. यासंबंधी इतर आणखी कार्यवाही सुरू आहे. इतर कार्यवाहीमध्ये मयत ग्रामसेवकाकडून ९ लाख ८५ हजार रक्कम येणे बाकी आहेत. कोर्टामध्ये प्रकरण संपले तर ४३ लाख रुपये मिळू शकतील.

कोर्ट आणि पोलिसांत दाखल असलेला फौजदारी गुन्हा मिळून एकूण १७ प्रकरणे आहेत. या दोन्ही विषयांमध्ये ४३ लाख रुपये इतकी रक्कम गुंतलेली आहे. २६ लोकांच्या विरुद्ध त्यांनी विभागीय चौकशी सुरु केली आहे. तरी पण ९४ लाख रुपयांची वसुली शिल्लक आहे. कोर्टात प्रकरण असले तरी ५० लाख रुपये वसुली करता येईल. मयत लोकांशी संबंधित रक्कम ११ लाख रुपये आहे.

यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, ७५ प्रकरणे लवकर निकाली निघू शकतात. विभागीय चौकशीची प्रकरणे लवकर निकाली काढता येतील, किमान वर्षभरात पूर्ण करा. पैसे वसुली सुरु करा.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, विभागीय चौकशीनुसार टप्प्याटप्प्याने वसुलीची कार्यवाही सुरु होईल तसेच विभागीय सचिवांनी खुलासा केला की, वेतनाच्या मानाने वसुली सुरु होईल, वसुलीचे टप्पे अधिक असतील.

## अभिप्राय व शिफारशी

ग्रामपंचायत/जवाहर रोजगार योजना/जवाहर ग्रामसमृध्दी योजना/संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेमध्ये माहे मार्च, २०१२ अखेर ग्रामपंचायत विभागाने शिल्लक अपहाराची १९४ प्रकरणे व रुपये १,६१,२६,७०० एवढ्या गुंतलेल्या रकमांचा तपशील सादर केलेला होता व स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालयात ठेवण्यात आलेल्या नोंदवहीनुसार अपहार प्रकरणामध्ये एकने तफावत आहे व गुंतलेल्या रक्कमेत रुपये ९६,१३६ एवढी तफावत आढळून आली. सन २०११-१२ मध्ये जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीच्या अफरातफरीबाबतचे एकही प्रकरण निकाली काढलेले नाही, यासंदर्भात धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान असे निदर्शनास आले आहे की, विविध योजनेतील १४३ अपहार प्रकरणातील रुपये १,२०,७३,९०७ रकमेंपैकी ६० प्रकरणे निकाली काढण्यात आली असून त्यातून रुपये २६ लाख ६७ हजार वसूली झालेली असून उर्वरित ८३ प्रकरणांमधून रुपये ९४ लाख ६ हजार ५२७ एवढी रक्कम वसूल होणे प्रलंबित आहे. काही प्रकरणे न्यायप्रविष्ट असून फौजदारी कार्यवाही सुरु असल्यामुळे १७ प्रकरणांमध्ये जवळजवळ रुपये ४३ लाख रक्कम येणे बाकी आहेत. तसेच मयत ग्रामसेवकांकडून रुपये ९ लाख ८५ हजार एवढी रक्कम येणे आहे, याप्रकरणी वसुलीसंदर्भात दिरंगाई करणाऱ्या संबंधित १४ विस्तार अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तद्‌नंतर कामकाजात दिरंगाई करणाऱ्या १० विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) पैकी ४ विस्तार अधिकारी यांचेविरुद्ध एक वेतन वाढ कायमस्वरुपी व उर्वरित ६ विस्तार अधिकारी यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली आहे, या कार्यवाहीबाबत समिती समाधान व्यक्त करते.

**अफरातफरीच्या प्रकरणांशी संबंधित १३६ ग्रामसेवकांवर अद्याप कोणतीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही त्यामुळे त्यांच्यावर तात्काळ कारवाई करून अफरातफरीमध्ये गुंतलेली रक्कम वसूल करण्यात यावी तसेच जी प्रकरणे मा.न्यायालयाच्या निर्णयासाठी प्रतिक्षाधिन आहेत अशा सर्व प्रकरणांसंबंधात लवकरात लवकर न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी. ज्या प्रकरणात मा. न्यायालयाने रक्कम वसूल करण्यास स्थगिती दिली नाही अशा सर्व प्रकरणी मा. न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून अफरातफरीची रक्कम वसूल करण्यासंदर्भात कार्यवाही करावी. मयत ग्रामसेवकाच्या बाबतीत रक्कमेचे स्वरुप लक्षात घेऊन अफरातफरीची रक्कम मोठ्या प्रमाणात असल्यास त्यांच्या वारसांकडून रक्कम वसुलीबाबतची कारवाई नियमास अधिन राहून करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे व उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीबाबतचा सर्वंकष अहवाल समितीस दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण तीन

**जिल्हा परिषद, धुळे**

**शासनमान्य अनुदानित वसतिगृहांचे प्रस्ताव मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत**

**परिच्छेद क्रमांक ३.५८६ (सन २०११-१२)**

समाजकल्याण विभागाच्या लेखापरिक्षणात खालील नमूद केलेल्या शासनमान्य अनुदानित वसतीगृहापासून महाराष्ट्र शासन समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, निर्णय बीसीएच १०९७/प्र.क्र.१०७/मावक-४, दिनांक १६ मार्च, १९९८ मधील परिच्छेद क्र.७, उप परिच्छेद ८ नुसार नोंदणीकृत सनदी लेखापालाचा लेखापरिक्षण अहवाल नंतरच्या वर्षांच्या कोणतेही अनुदान मिळणेसाठी आधीच्या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल चालू वर्षांच्या ऑक्टोबर अखेर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा समाजकल्याण अधिकारी यांना सादर केला पाहिजे. परंतु सदर वस्तीगृहाच्या व्यवस्थापकांनी सनदी लेखापाल यांचेकडून विहित मुदतीत विभागास लेखापरिक्षण अहवाल सादर न केल्यामुळे एकूण १४ संस्थांकडून ५ टक्के दंडाची रक्कम रुपये २,६३,४७० संबंधित संस्थाकडून वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला:--**

एकूण १४ अनुदानित वसतिगृहांकडून विहित मुदतीत विभागास लेखापरिक्षण अहवाल सादर न केल्यामुळे ५% दंडाची रक्कम रुपये २,६३,४७० इतकी वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शासनमान्य अनुदानित वसतिगृहाचे प्रस्ताव मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे ५ टक्के दंडाची रक्कम विहित मुदतीत वसूल न करण्याची कारणे काय आहेत. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, विहित मुदतीत लेखापरिक्षण अहवाल सादर न केल्यामुळे १५ संस्थांकडून दंडाची रक्कम वसूल करावयाची होती. सदरहू संस्थांना सन २०१४-१५ पर्यंत पूरक पोषण आहाराची केवळ ६० टक्के रक्कम देणे शक्य झाले आहे. सदरहू एकूण १०८ संस्था असून त्यांना शासनाकडून १५ कोटी रुपये अनुदानाची रक्कम देय आहे. उक्त संस्थांना सन २०१६-१७ पर्यंतची शासनाकडून देय असणारी रक्कम प्रलंबित आहे. सदरहू अनुदान प्राप्त झाल्यानंतर देय रकमेतून उक्त ५ टक्क्यांची रक्कम वसूल करण्यात येईल. यासर्व संस्थांना खूप कमी प्रमाणात अनुदान देण्यात येते.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

विहित मुदतीत लेखा परिक्षण अहवाल सादर न केल्यामुळे १५ संस्थाकडून दंडाची ५ टक्के रक्कम वसूल करण्यात आलेली आहे काय ? सदरहू १०८ संस्थांना रुपये १५.०० कोटी शासनाकडून देय असलेली रक्कम वितरित करण्यात आली आहे काय ? नसल्यास देय रक्कम प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

लेखा परिक्षण अहवाल मुदतपुर्व सादर न करणाऱ्या १५ संस्थांकडून देय अनुदानाच्या ५ टक्के दंडाची रक्कम वसूल करून चलनाने शासनखाती भरण्यात आलेली आहे. तसेच १०८ संस्थांना रुपये १४.१० कोटी रक्कम वितरित करण्यात आलेली आहे. उर्वरित संस्थांना सन २०१८-१९ च्या प्राप्त तरतुदी मधून अनुदान अदा करण्यात येईल.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा अभिप्राय** :-- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने धुळे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १५ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा

केली की, १५ संस्थांकडून दंडाची ५ टक्के रक्कम वसूल करण्यात आली आहे काय, सदरहू १०८ संस्थांना रुपये १५.०० कोटी शासनाकडून देय असलेली रक्कम वितरित करण्यात आली आहे काय, नसल्यास देय रक्कम प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, लेखा परीक्षण अहवाल मुदतपूर्व सादर न करणाऱ्या १५ संस्थांकडून देय अनुदानाच्या ५ टक्के दंडाची रक्कम वसूल करून चलनाद्वारे शासनाखाती भरणा करण्यात आली आहे. तसेच १०८ संस्थांना १४.१० कोटी रुपये अनुदान वितरित केले आहे. उर्वरित संस्थांना सन २०१८-१९ च्या प्राप्त तरतुदीतून अनुदान अदा करण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

शासनमान्य अनुदानित वसतिगृहांचे प्रस्ताव मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०११-१२ मध्ये एकूण १५ अनुदानित वसतिगृहांकडून विहित मुदतीत विभागास लेखा परिक्षण अहवाल सादर न केल्यामुळे ५% दंडाची रक्कम रुपये २,६३,४७० वसूल करण्यात आलेली आहे. सदरहू संस्थांना सन २०१४-१५ पर्यंत पुरक पोषण आहाराची केवळ ६० टक्के रक्कम देणे शक्य झाले आहे. **एकूण १०८ संस्थांना सन २०१६-१७ पर्यंतची शासनाकडून देय असणारी रुपये १४.१० कोटींची रक्कम वितरित करण्यात आलेली आहे. सदरहू देय अनुदानाच्या रकमेतून ५ टक्के दंडाची रक्कम वसूल करून शासन खाती विलंबाने भरणा करण्यात आलेली आहे. तथापि, १५ अनुदानित वसतिगृहांकडून विहित मुदतीत लेखापरिक्षण अहवाल विभागास सादर न करण्याची कारणे काय आहेत, यासंदर्भात सखोल चौकशी करण्यात यावी व सदर चौकशीनुसार लेखापरिक्षण अहवाल विलंबाने सादर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे**.

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, धुळे

## जिल्हा परिषदेमधील अपुर्ण स्थितीतील बांधकामे

### परिच्छेद क्रमांक ३.१०३६/१०/४४ (सन २००८-२००९)

जिल्हा परिषदांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा योजना, विहिरी, (निष्फळ/सुरु झालेल्या परंतु अपुर्ण) खेडयातील, जिल्हयातील रस्ते दुरुस्ती, प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्ती व बांधकाम, पशुवैदयकिय दवाखाना, शाळागृहे, समाजमंदिरे दुरुस्ती व बांधकामे, कोल्हापूर टाईप बंधारे इत्यादी स्थानिक व सामुहिक विकासाच्या जिल्हा परिषद, शासकीय व अभिकरण निधीतील योजनांना ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षात ती कामे पूर्ण होण्याची शासनाची अपेक्षा असते. तथापि, त्यापैकी काही कामे विभिन्न कारणांमुळे त्या त्या वर्षात पूर्ण होत नाहीत. अशी अपूर्णावस्थेतील कामे वर्षानुवर्षे पडून असतात. त्यामुळे त्यात गुंतलेला निधी निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकास योजनांचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपुर्णावस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची व त्यामुळे गुंतलेल्या निधीचे नुकसान होण्याची शक्यता असते. यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समितीने योजनांतर्गत व योजनेत्तर विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपुर्णावस्थेत पडून राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशा प्रकारे अपुर्णावस्थेत पडून असलेल्या बांधकामांचा तपशील पुढीलप्रमाणे केवळ उदाहरणादाखल दिला आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नांव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | धुळे | लघुपाटबंधारे | ४४ | २,१९,१६,००० |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदात नमूद  करण्यात आलेल्या एकूण ५० कामांपैकी २४ कामे पूर्ण झाली असून त्या कामांवर रुपये २१७.५७ लक्ष खर्च झाला आहे. त्या पुर्ण झालेल्या कामांचे काम पुर्णत्वाचे दाखले नमुना क्र.६५ ची छायांकित प्रत दप्तरी ठेवण्यात आलेली आहे.

उर्वरित अपुर्ण २४ कामे साधारणत: सन १९९३-९४ मध्ये सुरू करून अर्धवट अवस्थेत बंद होती. त्यानंतर सन २००८ मध्ये तत्कालिन उप अभियंता यांनी दिलेल्या अहवालानुसार सदर कामांची पडझड, उंदीर, घुसी यांनी केलेल्या बिळांमुळे कामे पुर्ण करणे योग्य होणार नसल्याचा अहवाल दिला होता. त्यामुळे निविदा शर्त ३-क खालील एकुण २४ कामे रद्द करणेबाबत जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या दि. १६ एप्रिल, २०१० रोजीच्या सभेत ठराव करण्यात आला आहे. छायांकित प्रत दप्तरी ठेवण्यात आलेली आहे.

तसेच उर्वरित २ अपुर्ण कामांपैकी सा.ब.आखाडे व सा.ब.पडावद नं.१ ही कामे लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभागाकडे वर्ग करण्यात आलेली आहेत.

कामांचा लेखाशिर्षनिहाय तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | योजनेचे नांव | अपुर्ण कामे संख्या | पूर्ण कामे संख्या | रद्द कामे संख्या | वर्ग कामे संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | को.प.बिगर आदिवासी | १५ | ०८ | ०५ | ०२ |
| २ | को.प.बिगर आदिवासी | ११ | ०० | ११ | - |
| ३ | ल.पा.बिगर आदिवासी | ०४ | ०२ | ०२ | - |
| ४ | ल.पा.बिगर आदिवासी | ०६ | ०० | ०६ | - |
| ५ | खान्देश विकास | ०३ | ०३ | ०० | - |
| ६ | मानव विकास मिशन | ११ | ११ | ०० | - |
| | एकुण | ५० | २४ | २४ | ०२ |

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, निविदा शर्त ३ (क) खाली रद्द करण्यात आलेल्या २४ कामांची सद्य:स्थिती काय आहे, जादा खर्च झाला असल्यास निविदा शर्त ३ (क) नुसार संबंधित कंत्राटदाराकडून वसूली करण्यात आलेली आहे काय, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) यांचेकडे वर्ग केलेल्या २ कामांची सद्य:स्थिती काय आहे, सदर कामे केव्हा वर्ग करण्यात आलेली आहेत, त्यासाठी किती निधी गुंतला आहे, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, एकूण ५० कामे होती, त्यापैकी २४ कामे पूर्ण तर २४ कामे रद्द करण्यात आलेली आहेत, तर २ कामे लघुपाटबंधारे (स्था.स्तर) यांचेकडे वर्ग केली आहेत. जी कामे अपूर्ण आहेत ती पूर्ण होऊ शकत नाहीत अशा कामाबाबत नोटीस देऊन ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याबाबत कळविले आहे. जी अपूर्ण कामे पूर्ण होण्याच्या पलिकडे होती म्हणून रद्द केलेली आहेत. ही कामे चार तालुक्यातील आहेत.

यावर समितीने २४ कामे कोणती आहेत, सदर कामांची यादी आहे का, ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त केली आहे काय, असे विचारले असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ठेकेदाराला अनामत रक्कम दिलेली नाही. त्यांचे नाव काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, सन १९९३-९४ पासूनची कामे आहेत. या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याबाबत जिल्हा परिषदेने शासनास कळविले. परंतु वरच्या पातळीवर निर्णय झाला नाही तेव्हा जिल्हा परिषदेने काय केले, या संस्था कोणाच्या आहेत, या संस्थांना कामे दिलेली आहेत अशी माहिती आहे. याबाबत जिल्हा परिषदेने तपासणी करावी, समितीची बैठक संपण्यापूर्वी समितीला माहिती द्यावी तसेच निविदा शर्त ३ (क) खाली कामे रद्द केली म्हणजे काय, नवीन काम पूर्ण करताना जो जास्तीचा खर्च असेल तो पूर्वीच्या ठेकेदाराकडून वसूल करावा, असे काही आहे काय, कामे रद्द केल्यानंतर नवीन कामे पूर्ण झाली आहेत काय, या प्रश्नावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेने सदर ठेकेदारांच्या संस्थांना कामे दिली नाहीत, नवीन कामे मंजूर केलेली नाहीत. ७३.७० लाख रुपयांची अपूर्ण कामे राहिली. ही कामे सन १९९३-९४ पासूनची आहेत. ही कामे अर्धवट होती. जेवढे काम झाले त्याचे मूल्यांकन करून पैसे दिलेले आहेत. पुढे कामे झालेली नाहीत. ही कामे पूर्ण करण्यासाठी एजन्सीला वारंवार नोटीसा दिलेल्या आहेत.

यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेने दुसऱ्या ठेकेदाराकडून काम पूर्ण करून घ्यावयास पाहिजे होते आणि जी तफावत आहे ती ३ (क) मध्ये बसत आहे. जिल्हा परिषदेने असे केले नाही. सन १९९३ ते १९९८ या कालावधीतील कामांची यादी द्यावी. श्री. चंद्रकांत रघुवंशी, समिती सदस्य तत्कालिन धुळे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. ठेकेदारांनी कामे अपूर्ण ठेवली असतील तर त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे किंवा त्यांच्याकडून रक्कम वसूल केली पाहिजे.

यानंतर समितीने पुन्हा विचारणा केली की, एखादे काम करण्याचा निर्णय घेण्यात येतो त्यावेळी त्याठिकाणी तपासणी करून संभाव्यता तपासतो त्यानंतर काम मंजूर करतो. म्हणजे त्याठिकाणी त्या कामांची आवश्यकता आहे. जर त्या कामांची आवश्यकता होती तर २४ कामे रद्द का केली, या प्रकरणामध्ये काम न करता देयके दिली होती, कोण ठेकेदार आहेत याची जिल्हा परिषदेकडून माहिती अपेक्षित आहे. ही सर्व माहिती समितीचे कामकाज संपण्यापूर्वी द्यावी. वर्ग करण्यात आलेली दोन कामे पूर्ण झाली आहेत काय, ही अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी किती खर्च येईल आणि झालेल्या कामाची किंमत किती आहे व जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक किती होते व आपण एकूण किती रकमेचे देयक अदा केले आहे, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दोन कामे स्थानिक क्षेत्राकडे हस्तांतरित केलेली आहेत. दोन अपूर्ण कामांपैकी सा.ब.आखाडे व सा.ब.पडावद नं. १ ही कामे लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभागाकडे हस्तांतरित केली आहेत. या कामाची अंदाजित किंमत रूपये २१.३९ लक्ष होती. त्यावर रूपये ९.११ लक्ष इतका खर्च झालेला आहे. या कामाचे सुधारित अंदाजपत्रक केले नाही. ही कामे दुरूस्तीच्या पलिकडची आहेत. कामाचे स्थळ बदलून काम करावे लागले. कंत्राटदाराचे डिपॉझिट जिल्हा परिषदेकडे आहे.

यावर समितीने निदेश दिले की, या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करावी. यास जो कोणी अभियंता जबाबदार असेल त्याच्या विरूद्ध कारवाई केली पाहिजे. हे काम सन १९९३-९४ मधील आहे. त्यावेळी जिल्हा परिषदेमध्ये तत्कालिन अभियंता कोण होते. संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावली पाहिजे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून एक महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करावा व त्यानंतर या विषयावर विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१) निविदा शर्त ३ (क) खाली रद्द करण्यात आलेल्या २४ कामांची सद्य:स्थिती काय आहे. सदर २४ कामे अपूर्ण अवस्थेत असल्याप्रकरणी संबधीत ठेकेदारांवर कोणती कारवाई केलेली आहे?

२) जिल्हयातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जिल्हा परिषदेअंतर्गत माहे मार्च २०१५ अखेर घेण्यात आलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेची सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) सन १९९० ते १९९६ च्या दरम्यान मंजूर केलेली एकूण २४ कामे अपुर्णावस्थेत व बंद होती. सन २००८ मध्ये तत्कालिन उप अभियंता यांनी चौकशी करून दिलेल्या अहवालानुसार सदर कामाची बरीचशी पडझड झालेली असल्याने सदरची कामे पुर्ण करणे योग्य होणार नसल्याचा अहवाल विभागीय कार्यालयास सादर केलेला होता. यास्तव जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या दि.१६/४/२०१० रोजीच्या सभेत ठराव क्रं.३८ नुसार सदर कामांचा मक्ता निविदा शर्त ३ (क) खाली रद्द करण्यात आलेला आहे. संबंधित एकूण-२० ठेकेदार, २५ कनिष्ठ/शाखा अभियंता, व १२ उपअभियंता यांचेवर जबाबदारी निश्चित केली, झालेला खर्च त्यांच्याकडून वसुल करण्याचे निश्चित केले आहे. सदर कामांवर एकूण रु. ७३.७० लक्ष इतका खर्च झालेला आहे. संबंधित कनिष्ठ /शाखा अभियंता, उपअभियंता व ठेकेदार यांना त्या संदर्भात वसुली बाबतच्या नोटीसा बजविण्यात आलेल्या आहेत.

तसेच अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, साक्री रोड, धुळे यांना संबंधित ठेकेदार यांची नावे काळया यादीत टाकण्याविषयी दि. २९ नोव्हेंबर, २००३, दि. १८ सप्टेंबर, २००६ व दि. १९ एप्रिल, २०१७ रोजी कळविण्यात आलेले आहे.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत धुळे जिल्हयात वलवाडी पाणी पुरवठा योजना घेण्यात आली होती. सदर योजनेतून दिनांक २५ एप्रिल २०१६ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. एक वर्षाचा चाचणी कालावधी पूर्ण करून सद्यस्थितीत ग्रामपंचायतीकडून योजनेमार्फत पाणी पुरवठा सुरु आहे. वलवाडी ग्रामपंचायत धुळे महानगरपालिका वाढीव हद्दीत समाविष्ट झालेली आहे. सदर योजनेची सविस्तर माहिती सोबत जोडली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

(1) **मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, धुळे यांनी दिलेल्या माहितीशी सहमत आहे.

(2) **पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेकडून प्राप्त माहिती सादर.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने धुळे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १५ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, निविदा शर्त ३ (क) खाली रद्द करण्यात आलेल्या २४ कामांची सद्य:स्थिती काय आहे, सदर २४ कामे अपूर्ण अवस्थेत असल्याप्रकरणी संबंधित ठेकेदारांवर कोणती कारवाई केली आहे.

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, २४ बांधकामे अपूर्ण होती. या कामांना सन १९९० ते १९९६ या काळात प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती. मधल्या काळात निधीअभावी किंवा वेगवेगळया कारणांमुळे ही कामे होऊ शकली नाहीत. सन २००८ मध्ये पंचायती राज समितीने जिल्हा दौरा केला होता त्यावेळी हा मुद्दा उपस्थित झालेला होता. सन २००८ नंतर या प्रकरणाची तपासणी करण्यात आली. सन २०१० मध्ये २४ कामांच्या ठेकेदारांचा मक्ता रद्द करण्याचा निर्णय जिल्हा परिषद समितीमध्ये घेण्यात आला. त्यानुसार असे ठरले की, दोषी लोकांविरुध्द कारवाई करण्यात यावी.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, सन १९९० ते १९९६ या काळातील प्रकरणे आहेत. कामाचा मक्ता रद्द केल्याचे नमूद केले आहे. नव्याने मक्ता दिला आहे का, कनिष्ठ/शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता ही तांत्रिक यंत्रणा असताना कामे का झाली नाहीत, उंदीर व घुशी यांच्यामुळे कामांची दुरवस्था होणे कितपत योग्य वाटते, तांत्रिक यंत्रणा असताना त्यांनी काहीच पाहणी केली नाही, यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, कोणतेही काम सुरु झालेले नाही. एजन्सी रद्द केलेली असली तरी दुसऱ्यांना काम दिलेले नाही. हे काम कॉंक्रिटमध्ये झालेले नाही. दगड व मुरुम वापरुन केलेली कामे होती. मक्ता रद्द करण्याची कारवाई जिल्हा परिषद स्तरावर झालेली आहे. यापैकी ६ अधिकारी निवृत्त झाले आहेत. सन २०१० मध्ये याबाबत निर्णय झाला. जे लोक सध्या कार्यरत आहेत त्यांच्या वेतनातून वसुली करावी लागेल. हे काम पाठपुरावा करून करावे लागेल. मंत्रालय स्तरावरुन देखरेख करु.

तद्नंतर समितीने पुन्हा विचारणा केली की, आजपर्यंत हे प्रकरण का थांबले ? अनियमितता झाली असताना आणि वसुलीस पात्र असताना कोणाची वाट पहात आहात, फार मोठी दिरंगाई आहे. ज्यांनी अनियमितता केली त्यांच्याविरुध्द तातडीने कारवाई होणे अपेक्षित होते. साक्षीसाठी समितीपुढे येत असताना प्रकरण निकाली काढणे अपेक्षित होते. समितीला निर्णयाची अपेक्षा आहे. समितीला गांभीर्याने घेतलेले दिसत नाही. शासनाच्या गतिमान योजना पूर्ण करण्यासाठी तुम्ही आम्ही बसलो आहोत. अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष दिले नाही तर जिल्हा गतिमान कसा होईल ? अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे शासनाचा निधी वाया गेलेला आहे.

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन २०१७ मध्ये नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. शाखा अभियंता, उपअभियंता हे जिल्हा परिषदेच्या अधिनस्त आहेत. त्यामुळे त्याबाबत जिल्हा परिषद स्तरावर पहावयास पाहिजे. वसुलीबाबत कार्यवाही सुरु आहे. जे दोषी आहेत त्यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव आहे. हे अधिकारी दोषी आहेत. शाखा अभियंता, उप अभियंता जिल्हा परिषदेच्या अंतर्गत आहेत. माझी आस्थापना जलसंपदा विभागाकडे आहे. विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करून प्रपत्र बजावले जाईल एवढी खात्री देता येईल.

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, जिल्हा परिषद स्तरावरील ५ पैकी १ अधिकारी त्याच जिल्हयात कार्यरत आहेत. त्यांच्याविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी एका महिन्यात कारवाई करतील. टप्प्याटप्प्याने वसुली करतील. ४ अधिकारी नाशिक जिल्हा परिषदेमध्ये बदली झालेले आहेत. नाशिकच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना तोंडी व लेखी पत्राद्वारे कळविण्यात येईल. हे पाचही अधिकारी जिल्हा परिषदेच्या आस्थापना स्तरावरचे आहेत. एका अधिकाऱ्याची वसुली धुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी करावी. ४ अधिकाऱ्यांविरुध्द नाशिकच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना धुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र पाठवावे. जुलै पेड इन ऑगस्टपासून वसुली सुरु होऊ शकते. वसुली करण्यापूर्वी नैसर्गिक न्याय तत्वानुसार त्यांना संधी दिली पाहिजे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, संबंधित अधिकाऱ्यांची वसुली करण्यापूर्वी नैसर्गिक न्याय तत्वानुसार संधी देण्याबद्दल वाद नाही. परंतु कारवाई तातडीने झाली पाहिजे आणि त्याचा अहवाल समितीला सादर केला पाहिजे, यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, जिल्हा परिषद स्तरावरील अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येईल आणि वरिष्ठ स्तरावरील अधिकारी आहेत त्यांच्याविरुध्द कारवाई सचिव, जलसंधारण विभाग यांनी घ्यावी.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा योजना, विहिरी, खेड्यातील रस्ते दुरुस्ती, प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरुस्ती व बांधकाम, पशुवैद्यकीय दवाखाने, शाळागृहे, समाजमंदिरे दुरुस्ती व बांधकामे, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे इत्यादींना ज्या वर्षात मंजुरी मिळते त्या वर्षात ती कामे पूर्ण होत नाहीत व वर्षानुवर्षे अपूर्णावस्थेत पडून राहिल्याने पडझड होऊन शासनाच्या गुंतलेल्या निधीचे नुकसान होते. जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत लघुपाटबंधारे विभागाच्या ५० कामांपैकी २४ कामे पूर्ण झाली असून त्या कामावर रुपये २१७.५७ लक्ष एवढा निधी खर्च झाला आहे. २४ कामे निविदा शर्त ३-क खाली रद्द करणेबाबत दिनांक १६ एप्रिल, २०१० रोजीच्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या सभेत ठराव करण्यात आला आहे. उर्वरित सा.ब.आखाडे व सा.ब. पडावद नं.१ ही २ अपूर्ण कामे लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभागाकडे वर्ग करण्यात आलेली आहेत. सदर अपूर्ण कामे सन १९९० ते १९९६ या कालावधीतील आहेत. कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता, कार्यकारी अभियंता ही तांत्रिक कामे पाहणारे अधिकारी असतानादेखील कामे पूर्ण झालेली नाहीत. समितीला सादर केलेल्या माहितीत सदर कामांची दुरावस्था उंदीर व घुशीमुळे होते असे म्हणणे ही बाब वस्तुस्थितीला धरून नाही, त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. यात जाणीवपूर्वक व अत्यंत निष्काळजीपणा दिसून येत आहे, त्यामुळे सदर अपूर्ण कामासाठी जबाबदार असणाऱ्या व सध्या कार्यरत असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतनातून झालेला खर्च वसूल करण्यात यावा असे समितीचे स्पष्ट निदेश आहेत. कारण या अपूर्ण कामामध्ये फार मोठी दिरंगाई झालेली असून अनियमितता देखील झालेली आहे, तसेच शासनाचा निधी देखील वाया गेलेला आहे. सदर कामे जिल्हा परिषदेच्या अधिनस्त आहेत, जिल्हा परिषद स्तरावर अपूर्ण स्थितीतील बांधकामे विहित कालमर्यादेमध्ये पूर्ण होण्यासाठी विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

**जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत सन १९९० पासून अपूर्ण स्थितीतील बांधकामे विभिन्न कारणामुळे पडून असल्याप्रकरणी सखोल व सविस्तर चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी तसेच तत्कालिन ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात अपूर्ण स्थितीतील बांधकामांमध्ये जेवढा निधी खर्च झालेला आहे तो खर्च संबंधित अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यापूर्वी नैसर्गिक न्याय तत्वानुसार त्यांना संधी देण्यात यावी. तथापि, त्यांनी सादर केलेल्या माहितीतून वस्तुस्थितीदर्शक व सबळ कारण दिसून न आल्यास झालेल्या नुकसानीची भरपाई संबंधितांकडून करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा सर्वंकष अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, धुळे

## पानखेडा (गावठाणपाडा) ता. साक्री येथील पाणीपुरवठा योजना कामातील अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ३.४७१/३/५ (सन २००८-२००९)**

विभागाने पानखेडा (गावठाण पाडा) तालुका साक्री येथील पाणीपुरवठा योजनेवर एकूण रु.११,२७,५२२/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) अंदाजपत्रकामधील बाब क्र. ४ वर अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु.७७/- जादा मक्तेदारास रक्कम रु.४१०/- इतके जादा प्रदान झालेले आहेत.

(२) बाब क्र.२ साठी मक्तेदारास रक्कम रु.१८२१/- जादा प्रदान झालेली आहे.

(३) वितरण व्यवस्था (अ) मधील बाब क्र. १ नुसार बाब क्र.२ साठी मक्तेदारास रक्कम रुपये ६९३४/- जादा प्रदान झालेले आहे.

(४) अंदाजपत्रकानुसार पाण्याची उंच टाकी कामातील बाब क्रं.२ साठी मक्तेदारास रक्कम रुपये ७८०/- जादा प्रदानाची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

(५) अंदाजपत्रकानुसार मक्तेदारास काम करणे बंधनकारक आहे. परिमाणात व मोजमापात काम करावयाचे असल्यास सक्षम तांत्रिक अधिकारी यांची पूर्व मान्यता घेतलेली नाही.

(६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, धुळे यांची आर्थिक मान्यता आदेशावर स्वाक्षरी नाही. आदेशातील अट क्र.१० अ नुसार तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी तसेच आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर ४५ टक्के निधीचे वितरण करणे आवश्यक असताना अग्रिम दिनांक ३० मार्च, २००७ रोजी समितीच्या खात्यावर वर्ग केलेले आहेत.

(७) कामाच्या नस्तीसोबत मक्तेदाराचा करारनामा रु. १००.०० चे मुद्रांक स्टॅम्प पेपरवर घेण्यात आलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर बाबतीत खालील प्रमाणे अनुपालन सादर करण्यात येत आहे.---

(१) दिनांक २३/१२/२०१६ रोजी रु. ४१०/- कोषागारात चलन भरणा केल्याबाबतची पोहोच सोबत सादर केली आहे.

(२) दिनांक २३/१२/२०१६ रोजी रु. १८२१/- कोषागारात चलन भरणा केल्याबाबतची पोहोच सोबत सादर केली आहे.

(३) दिनांक २३/१२/२०१६ रोजी रु. ६९३४/- कोषागारात चलन भरणा केल्याबाबतची पोहोच सोबत सादर केली आहे.

(४) दिनांक २३/१२/२०१६ रोजी रु. ७८०/- कोषागारात चलन भरणा केल्याबाबतची पोहोच सोबत सादर केली आहे.

(५) अंदाजपत्रकातील काही उपांगात जास्तीचे काम हे प्रत्यक्षात साईट वरील स्थिती नुसार करावे लागते. तथापि, कार्यकारी अभियंता यांनी कमी/जास्त विवरणपत्रास मंजुरी दिली आहे. तसेच ग्रामपंचायत, पानखेडा यांनी दिनांक १५/०८/२००८ रोजीच्या ग्रामसभेच्या ठराव क्रमांक १४ नुसार कमी/जास्त खर्चास मान्यता दिलेली आहे. सोबत कमी/जास्त झालेल्या खर्चाचे कामास मंजूरी घेतलेबाबतचे विवरणपत्र जोडले आहे. सोबत कमी/जास्त खर्चाचे विवरणपत्र ग्रामसभेच्या ठरावाची छायांकित प्रत सोबत सादर करण्यात येत आहे. सदर कामावरील खर्च अंदाजपत्रकीय रकमेच्या मर्यादित केलेला आहे. मंजूर रक्कम ११,८६,८६५/- व झालेला खर्च ११,८६,८६५/- आहे.

(६) आर्थिक मान्यता आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी घेणे अनावधानाने राहून गेले आहे. तथापि, आर्थिक मान्यतेस टिपणी दिनांक ३०.३.२००७ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली आहे. तांत्रिक मान्यता/प्रशासकीय मान्यता आदेशानंतरच अग्रिम दिनांक ३०.३.२००७ रोजी समितीस अदा केले आहे.

(७) रु.५०/- चे ०२ मुद्रांक स्टॅम्प वर करारनामा केला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने सदरहू लेखापरिच्छेदाबाबत चौकशी करून सविस्तर माहिती विभागाच्या सचिवांच्या साक्षीच्या वेळी सादर करावी असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

ग्रामीण पाणीपुरवठा पानखेडा (गावठाण पाडा) ता. साक्री येथील पाणीपुरवठा योजनेच्या कामातील अनियमिततेबाबत समितीने दिलेल्या निदेशानुसार सविस्तर चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध नियमानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर कामाची चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र/धुजिन/ग्रापापू/लेशा/पंरा/२०१८ दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१८ अन्वये उपअभियंता, साक्री यांना मौजे पानखेडा येथील नळ पाणीपुरवठा योजनेची सदयस्थितीबाबत चौकशी करण्याकामी कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजी उपअभियंता, साक्री यांनी चौकशी अहवाल खालीलप्रमाणे सादर केलेला आहे .---

| | | |
|---|---|---|
| मंजूर लेखाशिर्ष | - | भारत निर्माण कार्यक्रम अंतर्गत |
| मंजूर वर्ष | - | सन २००६-०७ |
| योजनेचे अंदाजपत्रकीय रक्कम | - | ११,८६,८६५/- |
| तांत्रिक मंजुरी आदेश | - | क्र.धुजिप/ग्रापापू/रेशा/तांम/७३२/२०१४, दि.३०.३.२००७ |
| अनुदान वितरित | - | |
| प्रथम हप्ता ४५% | - | रु.४,६५,०००/- दि.३०.३.२००७ |
| दुसरा हप्ता ३०% | - | रु.३,१०,०००/- दि.१.३.२००८ |
| अंतिम हप्ता | - | रु.३,४४,८००/- दि.३.२.२००९ |
| एकूण वितरित हप्ता | - | रु.११,१९,८००/- |
| योजना पूर्ण/अपूर्ण | - | पूर्ण |

सद्य:स्थिती :- सदरची योजना पूर्ण असून सदर योजनेव्दारे गावास पाणीपुरवठा सुरळीत सुरू आहे. सदर योजनेबाबत ग्रामस्थांची कुठलीही तक्रार नाही. तसेच सदर योजनेची अंमलबजावणी भारत निर्माण योजनेअंतर्गत ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमार्फत तांत्रिक सेवा पुरवठादारामार्फत करण्यात आलेली आहे. त्यामुळे अधिकारी/कर्मचारी यांचेवर कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. स्थानिक लेखापरिक्षणात सदर योजनेबाबत घेण्यात आलेल्या आक्षेपाचे अनुषंगाने ग्राम पाणीपुरवठा समितीकडून जादा प्रदान करण्यात आलेल्या रु. ९९४५/- इतक्या रकमेची वसुली करण्यात आलेली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा अभिप्राय :-** जिल्हा परिषदेमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात आलेली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने धुळे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १५ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पानखेडा, ता. साक्री येथील पाणीपुरवठा योजनेच्या कामातील अनियमिततेबाबत समितीने दिलेल्या निदेशानुसार सविस्तर चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले, तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध नियमानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, सदर काम केव्हाचे होते व केव्हा पूर्ण झाले ?

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, कार्यवाही झालेली आहे. ९९४५ रुपये वसूल केले आहेत. हे काम पूर्ण झालेले आहे. गाव पातळीवरील समितीमार्फत काम करण्यात आले होते, त्यावेळी तांत्रिक सेवा पुरवठादार नेमत होतो. त्यांच्यामार्फत काम पूर्ण झालेले आहे. सखोल चौकशी केल्यानंतर असे दिसून आले की, ९९४५ रुपये जादा खर्च दाखविला आहे, ती रक्कम त्यांच्याकडून वसूल केली आहे. सदर कामाला सन २००६-०७ ची प्रशासकीय मंजुरी होती, सन २००७ मध्ये तांत्रिक मंजुरी देण्यात आली होती. योजना सन २०११ मध्ये पूर्ण झाली आहे. सदर योजना पूर्ण होऊन पाणीपुरवठा सुरू आहे. खर्च कमी जास्त प्रमाणात झाल्याबद्दल आक्षेप होता. चौकशी करण्यात येऊन लेखापरीक्षण केले गेले. सखोल पाहणी केल्यानंतर ९९४५ रुपयांचा जादा खर्च दाखविला होता, तो वसूल केला आहे.

## अभिप्राय व शिफारशी

सन २००८-०९ मध्ये भारत निर्माण कार्यक्रम या लेखाशीर्षा अंतर्गत पानखेडा (गावठाणपाडा) ता. साक्री येथील पाणीपुरवठा योजना कामातील अनियमिततेसंदर्भात लेखा आक्षेपामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, सन २००६-०७ या वर्षात मंजूर असलेल्या या पाणीपुरवठा योजनेवर एकूण रुपये ११,२७,५२२/- एवढा खर्च करण्यात आलेला असून अंदाजपत्रकामधील बाब क्र.४ वर अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु.७७/- एवढा जादा दर दिल्याने मक्तेदारास रक्कम रु.४१०/- इतके जादा प्रदान झालेले आहेत, तसेच बाब क्र. २ साठी मक्तेदारास रक्कम रु १८२१/- जादा प्रदान झालेले आहेत. वितरण व्यवस्था (अ) मधील बाब क्र.१ नुसार बाब क्र.२ साठी मक्तेदारास रक्कम रु.६९३४/- एवढी रक्कम जादा प्रदान झालेली आहे. पाण्याची उंच टाकी बांधण्याच्या कामामध्ये मक्तेदारास रु ७८०/- एवढी जादा प्रदान केलेली रक्कम वसुल करण्यात आली नाही. परिमाण व मोजमाप कामामध्ये सक्षम तांत्रिक अधिकारी यांची पूर्व मान्यता घेतलेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांची आर्थिक मान्यता आदेशावर स्वाक्षरी नाही. तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी तसेच आवश्यक कागदपत्रांच्या पुर्ततेशिवाय निधी वर्ग करण्यात आला आहे. कामाच्या नस्तीसोबत मक्तेदाराचा करारनामा रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर घेण्यात आलेला नाही, या लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, धुळे यांनी लेखी खुलाशाद्वारे कळविले आहे की, जादा प्रदान केलेल्या सर्व रकमा दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी कोषागारात चलन भरणा करण्यात आल्या आहेत. तसेच सक्षम तांत्रिक अधिकारी, कार्यकारी अभियंता यांनी कमी / जास्त विवरण पत्रास मंजुरी दिली आहे, त्याबाबतचे विवरणपत्र जोडले असून ११,८६,८६५/- एवढ्या मंजूर रकमे एवढाच खर्च झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच आर्थिक मान्यता आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांची स्वाक्षरी

अनावधानाने राहून गेलेली असून दिनांक ३० मार्च, २००७ रोजी आर्थिक मान्यतेच्या टिप्पणीवर स्वाक्षरी केलेली आहे व मक्तेदाराचा करारनामा ५०/- रुपयांच्या २ मुद्रांक पेपरवर केला आहे. या लेखी माहितीच्या अनुषंगाने साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेस सन २००६-०७ मध्ये प्रशासकीय मंजुरी असताना देखील सुमारे ४ वर्षे विलंबाने म्हणजे सन २०११ मध्ये ही योजना पूर्ण करण्यात आली आहे आणि लेखा आक्षेप नमूद करण्यात आल्यानंतर दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी एवढ्या दिरंगाईनंतर जादा निधी प्रदानाची एकूण रक्कम रुपये ९,९४५/- पुरवठादाराकडून वसूल करून कोषागारात जमा केली आहे जिल्हा परिषदेच्या या खुलाशाबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

**वास्तविकत: सदर नळ पाणीपुरवठा योजना ही लोकोपयोगी मुलभूत सुविधा असून मान्यता प्राप्त होताच लवकरात लवकर कार्यान्वित करणे आवश्यक असताना देखील सुमारे ४ वर्षे विलंबाने सदर योजना कार्यान्वित केल्यामुळे तेथील नागरिकांना पाणीपुरवठ्यासारख्या मुलभूत सोयीपासून ४ वर्षे वंचित रहावे लागणे ही बाब जिल्हा परिषदेस निश्चितच भूषणावह नाही. याबाबत संबंधितांची उदासिनता दिसून येते, तसेच सदरहू योजनेकरिता पुरवठादारास जादा निधी वितरीत करण्यात आलेला होता. सदर जादा प्रदान करण्यात आलेल्या निधीची रक्कम वसूल करण्यासाठी व कोषागारात जमा करण्यासाठी प्रदीर्घ विलंब झालेला आहे व काही तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यात कसूर केल्याचेही आढळून आलेले आहे. तसेच आर्थिक मान्यता आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी घेण्याचे राहून गेले. या अक्षम्य दिरंगाई करणाऱ्या व वेळकाढूपणासाठी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन महिन्यांच्या आत समितीस सादर करण्यात यावा व राज्यात अशा योजना प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांनी नियोजित कार्यक्रम आखून त्याबाबतची जबाबदारी संबंधितांवर निश्चित करावी अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन महिन्यांच्या आत समितीस सादर करण्यात यावा.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, धुळे

## पुरक पोषण आहार, अंगणवाडी सेविका/मतदनीस मानधन इत्यादीबाबत निधीच्या आहरण व संवितरण तसेच लेखांकनातील अनियमितता तसेच शिक्षकांनी अपंगत्वाचे दाखले घेऊन शासनाची फसवणूक केल्याबाबत

**परिच्छेद क्रमांक ४.३१०/३ (सन २००८-२००९)**

पुरक पोषण आहार, अंगणवाडी सेविका/मदतनीस मानधन इ.बाबत निधींच्या आहरण व संवितरण तसेच लेखांकनातील अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.मबाआ-२००६/प्र.क्र.२१८/का-७ दि.०७/०९/२००६ च्या शासन निर्णयान्वये विषयांकित बाबींचे देयके निधी अभावी प्रलंबित राहू नये व देयकाची अदायगी वेळेवर व्हावी या हेतूने सदर निधी जिल्हा फंडात जमा न करता बालविकास प्रकल्प अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. त्यानुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी सदर निधीचे आहरण व संवितरण करून त्यांचे स्तरावर देयकांची अदायगी व लेखांकन करणे आवश्यक होते. तथापि, सदर निधी पुनश्च: जिल्हा फंडात नियमबाहय जमा करून शासन निर्णयातील निर्देशाचे उल्लंघन केलेले आहे.

(२) सदर निधीची देयके कोषागारात सादर करतांना उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांची प्रति स्वाक्षरी घेण्याचे देखील निर्देश असल्याचे मा.आयुक्त, एकात्मिक बालविकास प्रकल्प यांचे मार्फत निधी प्राप्त झालेनंतर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिनस्त येत असल्याने सदर निधीच्या खर्चाचे स्वतंत्र लेखांकन होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) बालविकास प्रकल्प अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी नव्याने घोषित केलेले असल्यामुळे त्यांनी त्यांचे स्तरावर उक्त अनुदानाचे आहरण व संवितरण कोषागारातून केलेले आहे. परंतु त्यावेळी त्यांचे बँक खाते उघडण्यात आलेले नसल्याने अंगणवाडी सेविका/मदतनीस मानधन अदायगी करणे तातडीचे असल्याने त्याबाबत वरिष्ठ कार्यालयास अवगत करून प्राप्त झालेला निधी गट विकास अधिकारी यांचे खाती जमा करून त्वरीत वितरित करण्यात आलेला आहे व त्यानंतर बँक खाते उघडण्यात आलेले आहे.

(२) अनुदान कोषागारातून आहरित करण्याची देयके कोषागारात सादर करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जि.प. धुळे यांची प्रतिस्वाक्षरी घेण्यात येवून देयके कोषागारात सादर करण्यात आलेली आहे. तथापि, केवळ एका देयकांच्या स्थळप्रतीवर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., धुळे यांची प्रतिस्वाक्षरी घेण्याचे अनावधनाने राहून गेलेले होते. आता प्रतिस्वाक्षरी घेण्यात आलेली आहे व दप्तरी ठेवण्यात आलेली आहे. कृपया खुलासा मान्य होणेस विनंती.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पूरक पोषण आहार कोण देतो, त्याबाबतची सद्य: स्थिती काय आहे, यावर प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) यांनी खुलासा केला की, ३ ते ६ वर्षाची अंगणवाडीमध्ये येणारी जी मुले आहेत व ज्यांना गरज आहे अशांना पोषण आहार दिला जातो. त्याची उपलब्ध पदार्थाची यादी ठरलेली असते. उपलब्ध पदार्थ तपासले जातात. अन्न पदार्थाची चव घेतली जाते. त्यासाठी पर्यवेक्षिका नेमलेल्या आहेत. पर्यवेक्षिकांची ७२ पदे असून १० जागा रिक्त आहेत.अंगणवाडीतील मुलांना शिजवून आहार दिला जातो. तसेच अमृता योजना ही आदिवासी भागासाठी आहे, यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, शालेय पोषण आहारांतर्गत आठवड्यातून एकदा पूरक आहार दिला जातो. यात शेंगदाणा, चिक्की, खजूर, लाडू अशा प्रकारचा पूरक आहार दिला जातो.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, शासनाकडून अन्नधान्याचा पुरवठा केला जातो तेव्हा तो माल मोजमाप करून घेण्यात येतो काय ? बऱ्याच वेळा ५० किलोचे धान्याचे पोते आहे असे सांगितले जाते. परंतु प्रत्यक्षात त्याचे वजन ५० किलो पेक्षा कमी भरते. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, वजन करूनच माल घेण्यात येतो. काही वेळा गोदामाला भेट देतो. तेथे देखील वजन करून पाहण्यात येते. तसेच गाडीसोबत देखील काटा असतो. मुख्याध्यापकांनी हरकत घेतली तर लगेच माल मोजून दाखविला जातो. तसेच यानंतर प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी खुलासा केला की, धान्य हे एफसीआय मधून येत असल्यामुळे धान्याचे वजन काही वेळा ५०० ग्रॅमने कमी असल्याचे आम्हाला आढळून आलेले आहे.

यानंतर समितीने निदेश दिले की, अ. क्र. ४२, ४३, ४४ व ४५ च्या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी. तसेच अ. क्र. ४२, ४३, ४४, ४५ च्या संदर्भात चौकशी करून त्यासंदर्भातील अहवाल समितीला उपलब्ध करून देण्यात यावा.

यानंतर समितीने अ. क्र. ४६, ४७, ४८ व ४९ मध्ये लेखापरीक्षणाचा अभिप्राय नाही. अ. क्र. ५० ची काय परिस्थिती आहे अशी विचारणा केल्यावर प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणामध्ये १४,७५४/- रुपये वसूल झालेले आहेत.

यानंतर समितीने अतिशय गंभीर मुद्याकडे लक्ष वेधले. धुळे जिल्ह्यात शिक्षकांचे अपंग युनिट असून गेल्या १० वर्षात यावर ११०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. ८ अपंग विद्यार्थ्यांच्यामागे एक शिक्षक असून धुळे जिल्ह्यामध्ये असे ९४७ शिक्षक आहे. जिल्हापरिषदेत शिक्षकाच्या नोकरीवर लागल्यानंतर अपंगत्वाचा दाखला घेऊन त्यांनी एसटी बस प्रवासात, रेल्वेच्या प्रवासात तसेच इन्कम टॅक्समध्ये सवलती मिळविल्या आहेत. त्यामुळे या सर्वांची चौकशी होणे आवश्यक असून सर्व पत्रव्यवहार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे दिलेला आहे. अपंगाचा दाखला घेऊन आलेले सर्व शिक्षक बोगस आहेत हे इतर शिक्षकांना देखील मान्य आहे. शिक्षक म्हणून नोकरीला लागल्यानंतर या शिक्षकांनी अपंगत्वाचे दाखले मिळवलेले आहेत. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून या विषयाच्या संदर्भात माहिती मागविली होती. त्यासंदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी यांना काय म्हणावयाचे आहे ?

त्यावर प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी खुलासा केला की, अपंगाच्या युनिटची त्यांना माहिती नव्हती. जो दुसरा मुद्दा उपस्थित केला आहे त्यासंदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी सेवेत लागल्यानंतर किती शिक्षकांनी अपंगत्वाचे दाखले घेतले आहेत याची माहिती दिलेली आहे. सद्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र ऑनलाईन मिळते.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, शिक्षकांनी अपंगत्वाचे दाखले घेऊन शासनाची फसवणूक केली आहे. या शिक्षकांनी अपंगाच्या दाखल्याचा फायदा घेऊन रेल्वेमध्ये ७५ टक्के सवलतीचा फायदा घेतलेला आहे. या शिक्षकांनी एसटी बस प्रवासामध्ये ५० टक्के सवलत घेऊन प्रवास केलेला आहे. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना या प्रकरणाच्या संदर्भात जी काही माहिती दिलेली आहे त्याबाबत कोणती ॲक्शन घेतली आहे ? जिल्हा परिषदेमध्ये शिक्षक म्हणून नोकरीला लागल्यानंतर हे लोक अपंग झालेले आहेत त्याची समितीला माहिती द्यावी. हा विषय गंभीर असल्यामुळे या विषयासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष लावण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(1) जिल्ह्यातील अंगणवाडी पर्यवेक्षिकांच्या रिक्त असलेल्या १० जागा भरल्या आहेत काय, नसल्यास त्याची कारणे काय?

(2) जिल्ह्यात काही शिक्षकांनी अपंगत्वाचे दाखले घेऊन शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी त्यांचेविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे तसेच अपंगत्वाचे बोगस प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केलेली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) एकात्मिक बाल विकास सेवा योजना जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत सरळ सेवेची ५० टक्के व अंगणवाडी सेविकामधून ५० टक्के आरक्षणानुसार स्पर्धा परीक्षा निवड पद्धतीने भरावयाची अंगणवाडी पर्यवेक्षकांची १० पदे रिक्त आहेत. सदरील पदे

भरणे बाबत शासनाकडून आदेश प्राप्त झालेबरोबर त्वरीत भरणेत येतील, याबाबत मुख्य सेविका संवर्गातील भरतीबाबत सेवा शर्ती तयार करण्याचे काम शासन स्तरावर सुरू असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांनी दिलेल्या अभिप्रायास आयुक्त कार्यालय सहमत आहे.

(२) धुळे जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांपैकी १८६ शिक्षक अपंग आहेत, १८६ पैकी १६६ अपंग शिक्षकांनी सदर प्रणालींतर्गत ऑनलाईन अपंग प्रमाणपत्र सादर केली आहेत. ऑनलाईन अपंग प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या या २० अपंग शिक्षकांना मिळणारे अपंगत्वाचे लाभ आदेश क्रंधुजिप/शिक्षण/आस्था-६/१५५/२०१८ दिनांक २७.३.२०१८ अन्वये काढून घेण्यात आले आहेत.

तसेच सदर २० शिक्षकांचे ऑफलाईन अपंगत्व प्रमाणपत्रांची वैधता पडताळणीकामी मा.अधिष्ठाता, भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकिय महाविदयालय व सर्वोपचार रुग्णालयातील वैद्यकीय मंडळाकडे या कार्यालयाचे पत्र क्रं धुजिप/शिविप्रा/आस्था-६/१६८अ/२०१८ धुळे दिनांक १६.४.२०१८ अन्वये पाठविण्यात आले आहेत. त्यांचेकडील तपासणी अहवाल प्राप्त झालेनंतर पुढील कारवाई करणेत येईल.

## मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**(१) महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय :-** मुख्य सेविकांचे सेवा प्रवेश नियम तयार करण्याचे काम शासन स्तरावर सुरु आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचे अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

**(२) शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने केलेली कारवाई योग्य असून याप्रकरणी शासनस्तरावरून वेगळी कार्यवाही अपेक्षित नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने धुळे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १५ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्ह्यातील अंगणवाडी पर्यवेक्षिकांच्या रिक्त असलेल्या १० जागा भरल्या आहेत काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, एकात्मिक बाल विकास सेवा योजना जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत सरळ सेवेची ५० टक्के व अंगणवाडी सेविकांमधून ५० टक्के आरक्षणानुसार स्पर्धा परीक्षा निवड पद्धतीने भरावयाची अंगणवाडी पर्यवेक्षकांची १० पदे रिक्त आहेत. मुख्य सेविका संवर्गातील भरतीबाबत सेवा शर्ती तयार करण्यासाठी सूचना प्राप्त झालेली आहे. नियम तयार करण्यात आले असून, ते सादर करण्यात आले आहेत. सर्व पर्यवेक्षक संघटनांसमवेत चर्चा केलेली आहे. त्यानुसार ते सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविले आहे. परंतु, सामान्य प्रशासन विभागाने त्यामध्ये काही त्रुटी काढून ते पुन्हा महिला व बाल विकास विभागाकडे पाठविले आहेत. या त्रुटींची पूर्तता केल्यानंतर भर्तीचे नियम सादर केले जाणार आहेत.

यानंतर समितीने विचारणा केली की, सद्य:स्थितीत या प्रक्रियेस विलंब लागलेला असून, त्याची कारणे काय आहेत ? या प्रक्रियेसाठी किती वर्षे लागली आहेत ? यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, दोन्ही पदोन्नतीचे विषय आहेत. त्या संदर्भातील नस्ती पाठविलेली आहे. सदरहू नस्ती ३ वर्षांपासून प्रलंबित होती. पर्यवेक्षकाची मूळ नस्ती विभागीय सचिवांकडे आहे. परंतु, सी.डी.पी.ओ.ची नस्ती विभागीय सचिवांकडे नाही. मूळ नस्ती विभागीय सचिवांकडे असून, ती पूर्ण करून पाठविली जाणार आहे. तातडीने सर्व विषय घेतले आहेत. सुपरवाईजर ते सीडीपीओच्या प्रमोशनमध्ये कोर्ट केसेस असल्यामुळे उशिर झालेला आहे. मूळ नस्ती विभागीय सचिवांकडे आहे. दोन महिन्यात पदोन्नतीची नस्ती पूर्ण केली जाणार आहे.

यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, पर्यवेक्षकाच्या जागा रिक्त आहेत. सभागृहात या विषयावर नेहमी चर्चा झालेली आहे. महिला व बाल कल्याण विभागातील पोषण आहारासंदर्भात सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेल्या आहेत. अनेक वेळा मंत्री महोदयांवर आरोप करण्यात आलेले आहेत. परंतु, हा भाग वेगळा आहे. विभागाने प्रमोशन देण्याबाबत बराचसा विलंब लावलेला आहे. पदोन्नतीचा विषय एका जिल्ह्यापुरता मर्यादित नसून, तो महाराष्ट्राचा आहे. पदोन्नतीबाबत सचिवांनी योग्य ती कार्यवाही करावी, अशी समितीची सूचना आहे.

यावर विभागीय सचिवांनी माहिती दिली की, पर्यवेक्षकाचा संवर्ग जिल्हापरिषदेत आहे. यामध्ये न्यायालयामध्ये वेगवेगळे दावे दाखल करण्यात आले आहेत. सांख्यीकी सहाय्यक, पर्यवेक्षकाच्या दोन संघटना आणि सहाय्यक गटविकास अधिकारी यांनी न्यायालयात दावे दाखल केलेले आहेत. अंगणवाडीसेविका ते पर्यवेक्षक असा प्रश्न होता. म्हणून आश्वासन दिले होते की, पुढील दोन महिन्यात यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करणार आहे. पर्यवेक्षक ते बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्यामध्ये प्रश्न आहे. यामध्ये प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. शासनाने नवीन आकृतीबंध अमान्य केलेला आहे. यामध्ये ८० टक्के चाचणी घेऊन आणि २० टक्के सेवाज्येष्ठता भरती प्रक्रिया राबविली जाणार आहे. याबाबतची माहिती प्रतिज्ञापत्राद्वारे माननीय न्यायालयात सादर केलेली आहे. माननीय न्यायालयाने स्थगिती उठविली नाही. आता सुट्टी आहे. सुट्टी संपल्यानंतर माननीय न्यायालयाने जी स्थगिती दिलेली आहे आणि ती उठविण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

दोन संवर्ग बंद केले होते. बालविकास प्रकल्प अधिकारी हा सवर्ग हा महिला व बालविकास विभागाकडे आलेला आहे. त्यामुळे पदोन्नतीचा मार्ग बंद झाला अशी भीती त्यांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे. सेवेमध्ये बदल झाला तर त्यांना माननीय न्यायालयात जाण्याचा अधिकार आहे. प्रत्येक वेळी विभागाची टक्केवारी ४५ टक्क्यावरुन ५० टक्क्यांवर घ्यावी असे सांगितले जात आहे. आता ८० टक्के ऑनलाईन परीक्षा घेतली जाणार आहे आणि २० टक्के सेवाज्येष्ठतेने भरती प्रक्रिया राबविली जाणार आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, अपंगत्वाच्या बोगस दाखल्यांबाबतचा विषय आहे. अपंगांना बऱ्याच मोठ्या प्रमाणात अपंगत्वाचे दाखले देऊन त्यांनी नोकरी आणि इतर बाबतीत फायदे घेतले आहेत.  त्याबाबतची सद्य:स्थिती सचिवांनी सांगावी. आपल्याकडे तशा काही तक्रारी आल्या आहेत किंवा कसे ? धुळे जिल्ह्यात काही शिक्षकांनी अपंगत्वाचे दाखले घेऊन शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी त्यांचेविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे तसेच अपंगत्वाचे बोगस प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही केली.

यावर आरोग्य विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, ज्याप्रमाणे जात पडताळणी प्रमाणपत्राच्या तपासण्यांसाठी विविध समित्यांची यंत्रणा आहे. त्यानुसार नोकरी लागल्यानंतर प्रत्येकाला जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असते. तशी पद्धत अपंगत्वासंबंधी नाही. आता साधारणपणे एक दीड महिन्यांपूर्वी अतिरिक्त मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे या विषयासंबंधी एक बैठक झाली होती. कारण अशा अनेक तक्रारी येत आहेत की अनेक जण अशाप्रकारे अपंगत्व प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन उमेदवार सरकारी नोकरीमध्ये येतात.  इतकेच नाही तर, भारतीय नागरी सेवेमध्ये (सिव्हील सर्व्हीसेसमध्ये) म्हणजे आय.ए.एस.मध्ये निवड झालेल्या उमेदवारांकडूनसुद्धा अपंगत्वाचे बोगस प्रमाणपत्र सादर केल्याची तक्रार प्राप्त झाली. त्याबाबत चौकशी करण्यात आली आहे. त्यामुळे यासंबंधी शासनाचे काही तरी धोरण असावे की, त्या उमेदवाराने नोकरीमध्ये प्रवेश केल्यानंतर त्याने सादर केलेल्या अपंगत्व प्रमाणपत्राची तपासणी व्हावी. मात्र आजमितीस यासंबंधी तसे शासनाचे कोणतेही धोरण नाही. हा विषय इतिवृत्तामध्ये शिक्षकांबद्दल आला आहे. पण त्यावेळी जी तक्रार प्राप्त झाली होती ती शिक्षकांबद्दल नव्हती. माननीय आमदारांनी मुख्यमंत्री महोदयांना एक पत्र लिहिले होते की, राज्य परिवहन विभाग, धुळे येथील वाहनचालक यांना रातांधळेपणाचे चुकीचे प्रमाणपत्र देण्यात आले असा तो चुकीचा विषय होता. शिक्षकांच्या बाबतीत अशी कोणतीही तक्रार किंवा पत्र आमच्याकडे प्राप्त झालेले नाही.

या खुलाशानंतर समितीने विचारणा केली की, शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांना यामध्ये १८६ अपंग शिक्षकांनी अपंगत्वाची प्रमाणपत्रे सादर केली आहेत, हे खरे आहे काय ?  होय किंवा नाही अशा शब्दात आपण सांगावे. यावर शालेय शिक्षण

विभागाच्या सचिवांनी विदित केले की,  हे सर्व शिक्षणाधिकारी यांनी तपासले आहे. १६६ शिक्षकांनी ऑनलाईन प्रमाणपत्र नोंदणी केली आहे आणि २० उमेदवारांनी नोंदणी केली नाही. शालेय शिक्षण विभागाने त्यांची माहिती गोळा करून आता भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला पाठविली आहे. शिक्षकांची भरती करणे हा विषय शिक्षण विभागाचा नाही तर, ती ग्रामविकास विभाग आणि जिल्हा परिषदेमार्फत केली जाते. हा मुद्दा कसा समोर आला, ते मला माहिती नाही. मात्र हे समोर आल्यानंतर जिल्हा परिषद, धुळे यांचा शिक्षण विभाग याबाबत तपासणी करीत आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, ज्या २० शिक्षकांनी ऑफलाईन अपंगत्वाची प्रमाणपत्रे सादर केली आहेत त्यांची प्रमाणपत्रे तपासणीसाठी भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक यांच्याकडे ९ महिन्यानंतर पाठविण्यात आली आहेत. हा ९ महिन्यांचा विलंब का झाला आणि ज्यांनी १६६ प्रमाणपत्रे ऑनलाईन सादर केली आहेत, ती खरी आहेत काय, कारण बदलीच्या धाकाने किंवा अन्य कारणांमुळे शिक्षक अशा प्रकारचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करतात. हा आमचा अनुभव आहे. अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करून शासकीय नोकरीमध्ये स्थान मिळवितात. मात्र प्रत्यक्षात ते अपंग नसतात. श्रावणबाळ योजनेमध्ये शासन ६०० रुपये महिना देते. त्यामध्ये ३९ टक्के अपंग असेल तर आपण त्याला लाभ देत नाही. त्यासाठी ४० टक्के अपंग असला पाहिजे असा निकष आहे. आपण एका टक्क्यासाठी हा लाभ देत नाही. मात्र इथे तर खोटी अपंगत्वाची प्रमाणपत्रे सादर करून लोक नोकरी मिळवित आहेत. त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली जाईल, हा आमचा मूलभूत प्रश्न आहे.

यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, धुळे जिल्ह्याचा प्रश्न थोडा वेगळा होता. धुळे जिल्ह्यामध्ये अशी शक्यता होती की, काही लोकांनी चुकीचे प्रमाणपत्र दिले. यासंबंधी आम्ही उत्तरामध्ये नमूद केल्याप्रमाणे चुकीचे प्रमाणपत्र निवड प्रक्रियेपूर्वी सादर करून जर एखादा व्यक्ती नोकरीवर रुजु होते त्यावेळी त्याने जातीचे प्रमाणपत्र किंवा असे प्रमाणपत्र सादर केले असेल तर ते नियुक्ती अधिकाऱ्यांकडून तपासले जाते. तद्नंतर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी सांगितले आहे की जात प्रमाणपत्रासाठी तर अतिशय स्टॅन्डर्ड झालेले आहे. जात प्रमाणपत्रानंतर जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येते. तशी पध्दत अपंगत्व प्रमाणपत्राबद्दल नाही. या प्रकरणी २० उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करताना सांगितले होते की ,आमच्याकडे अपंगत्वाचे प्रमाणपत्र आहे. त्यांच्याकडे तसे प्रमाणपत्र मिळालेले नाही. त्यामुळे त्यांना देण्यात आलेले लाभ परत घेण्यात आले आहेत. पण त्यांची प्रमाणपत्रे दुसऱ्या वैद्यकीय महाविद्यालयात तपासणीसाठी पाठविली आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, संबंधितांचे अपंगत्वाचे लाभ जरी काढून घेतले असले तरी त्याने बोगस प्रमाणपत्र सादर केले असेल तर त्याच्यावर कार्यवाही सुरू व्हायला हवी. कारण आपण स्वत:च म्हणता की, त्यांचे लाभ काढून घेण्यात यावेत. आपलेच असे आदेश आहेत.

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडून जर असे कळविण्यात आले की हे लोक अपंग नाहीत तर त्यांच्यावर सर्व प्रकारची कार्यवाही करण्यात येईल. त्यांची नोकरी तर जाणारच आहे. ते अशी प्रमाणपत्रे देऊ शकली नसल्यामुळे आपण त्यांच्याकडून तात्पुरत्या स्वरूपात दिलेले लाभ काढून घेतले. पण ते जर अपंग निघाले नाहीतच तर त्यांची शंभर टक्के नोकरी जाईल. मात्र अशा प्रकारचे लेखी धोरण सध्या शासनाचे अपंगाच्या दाखल्याच्या पडताळणीसंबंधी नाही. जसे जातीची पडताळणी करण्याचे शासनाचे धोरण आहे तशी या अपंगत्वाच्या दाखल्याची पडताळणी करण्याचे शासनाचे धोरण नाही. ज्याप्रमाणे जातीच्या प्रमाणपत्रासंबंधी वैधता तपासणीचा दुसरा एक टप्पा आहे. त्याप्रमाणे अपंगत्व सिध्द करण्यासंबंधीचा दुसरा टप्पा नाही. जर त्यांनी असे प्रमाणपत्र चुकीच्या पध्दतीने मिळविले असेल तरी आपण त्याची पुन्हा जनरली तपासणी करीत नाही. जर काही तक्रार वगैरे आली तर तशी तपासणी करतो. या केसमध्ये तक्रार आली आहे आणि त्यांपैकी २० लोकांनी असे प्रमाणपत्रसुद्धा दिलेले नाही. त्यामुळे त्या २० लोकांना दिलेले फायदे त्यांच्याकडून परत घेतले आहेत. पण जर भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने सांगितले की, हे लोक अपंग नाही तर त्यांची नोकरीसुद्धा जाईल. त्यासाठी आम्हाला ग्रामविकास विभागाला कळवावे लागेल. कारण त्यांची नियुक्ती करणारी प्राधिकारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहे. निवड जरी दुसऱ्यांकडून केली तरी त्या लोकांची नियुक्ती ग्रामविकास विभाग करतो. या प्रकरणी दिवसेंदिवस तक्रारी वाढत आहेत. एवढेच नाही तर मी आपल्याला बदलीच्या बाबतीतसुद्धा अपंगांना बदली देताना आम्ही त्यांच्या

मनाप्रमाणे प्रथम प्राधान्य देतो. कारण त्यांची गरज वेगळी असते. त्यामुळे आपण त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे प्राधान्य देऊन बदली करतो आणि नंतर इतरांचा विचार करतो. अशा बदल्या करताना आपण त्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील मुलगा किंवा मुलगी जर अपंग असेल तर त्यांनाही प्राधान्य दिले जाते. मात्र यामध्येसुद्धा आता तक्रारी येऊ लागल्या आहेत. त्यामुळे प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य यांनी सांगितल्याप्रमाणे ग्रामविकास विभाग त्यासंबंधी जिल्हा परिषदेसाठी एक धोरण तयार करेल. त्यामध्ये जर कोणीही अशा पध्दतीने चुकीची नियुक्ती घेऊन आले तर त्याची तपासणी होईल व त्यानुसार कार्यवाही होईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, या प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत जी प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत ती बनावट आहेत. त्या बनावट प्रमाणपत्रांच्या आधारावर अपंग म्हणून ते लोक नोकरीमध्ये लागले आहेत. आता आपण त्यासंबंधी धोरण करणार आहात ते ठीक आहे. मात्र या प्रकरणामध्ये अपंगत्त्वाचे प्रमाणपत्र देऊन त्या बनावट प्रमाणपत्राच्या आधारे ज्यांनी गैरफायदा घेतला आहे. त्यांच्यावर कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे.

यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, या उमेदवारांच्या बाबतीत जेव्हा हिरे महाविद्यालयाकडून आपल्याला पत्र येईल त्यानंतर लगेच कारवाई करण्यात येईल. पण तोपर्यंत वाट पहावी लागेल. कारण त्या महाविद्यालयाने जर सांगितले की ही प्रमाणपत्रे खरी आहेत, तर आपल्याला काही करता येणार नाही. हिरे महाविद्यालयाला हे पत्र दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी पाठविले आहे.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, समिती त्या जिल्ह्यामध्ये आल्यानंतर हे प्रकरण उघड झाले. हे प्रकरण इतके गंभीर असताना त्याची गंभीरता लक्षात घेता. त्यासंबंधी जलदगतीने निर्णय व्हायला हवे होते. मात्र जवळपास १ वर्ष झाल्यानंतरही आजपर्यंत त्यासंबंधी कोणताही निर्णय झालेला नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशा सर्व शिक्षकांना आदेश दिले पाहिजे होते की, जर शिक्षक १५ दिवसांच्या आत हजर झाले नाहीत तर त्यांचा पगार बंद करू. १५ दिवसांच्या आत ते हजर होतील आणि त्यानंतर पुढील १५ दिवसांत ती व्यक्ती खरोखर अपंग आहे किंवा नाही हे कळेल. या कालावधीत संबंधित व्यक्ती शरिरीकदृष्ट्या तेथे जातील व त्या काळात त्यांची तपासणी होईल आणि जर ते बोगस अपंगत्वाचे प्रमाणपत्र घेतल्याचे आढळून आले तर त्यांची नोकरी तर जाईलच. पण कधी कधी असे होते की जर एखादा व्यक्ती ३५ टक्के असेल किंवा कोणी ४० टक्के वा ४२ टक्के असेल तर मेडिकली थोडे कमी-जास्त असू शकेल.

जिल्हा परिषदेच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, १८६ पैकी १६६ शिक्षकांनी अपंग प्रमाणपत्र ऑनलाईन प्रणालीमार्फत अपंगांची प्रमाणपत्रे सादर केली आहेत आणि २० जणांनी ती ऑनलाईन न करता ऑफलाईन सादर केली आहेत. ऑफलाईन प्रमाणपत्रे सादर केल्यामुळे ती तपासणीसाठी पाठविली. मात्र ज्यांनी ऑनलाईन प्रमाणपत्रे सादर केली आहेत त्याची सत्यता पडताळणी कशावरून केली आहे. हा प्रकार सर्वच जिल्ह्यामध्ये आहे. बदल्यांच्या वेळेस तर वाट्टेलतेवढी प्रमाणपत्रे मिळतात आणि ती ऑनलाईन टाकली की त्यांना पाहिजे तेथे बदली मिळते. आता आपल्याला हे एक नमुना मिळालेले आहे, त्यामुळे आपण उर्वरित १६६ शिक्षकांचीसुद्धा पडताळणी करावी.

यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, तपासणीच्या धोरणाचा विभाग एक मसुदा तयार करेल. परंतु त्यासंबंधी कृपया कालमर्यादा निश्चित करू नका. कारण विभागाला ते आमच्या स्तरावर निश्चित करता येणार नाही तर इतर विभागांकडे ते धोरण पाठवावे लागेल. त्यामध्ये सामजिक न्याय विभाग व इतर विभाग असतील. आपल्याला ते वेगळ्या पध्दतीने करावे लागेल. कारण त्याचे पर्शिप्शन चुकीचे जाऊ नये एवढेच. ते धोरण आम्ही तयार करू. त्यामुळे त्याला कृपा करून कालमर्यादा निश्चित करू नका. पण या २० कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आम्ही १ महिन्याच्या आत तपासणी करू आणि त्यामध्ये जर ते पात्र आढळून आले नाहीत तर, सर्वात गंभीर कार्यवाही जी करावी लागेल ती कार्यवाही आम्ही करु.

## अभिप्राय व शिफारशी

महिला व बालविकास विभागाच्या दिनांक ७ सप्टेंबर, २००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पूरक पोषण आहार/अंगणवाडी सेविका/ मदतनीस मानधन इत्यादी देयके निधीअभावी प्रलंबित राहू नये व देयकाची अदायगी वेळेवर व्हावी, या हेतूने सदर निधी

जिल्हा फंडात जमा न करता बालविकास प्रकल्प अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी (डीडीओ) म्हणून घोषीत केलेले आहे. तथापि, धुळे जिल्हा परिषदेने शासन निर्णयातील निर्देशाचे उल्लंघन केले असून सदर निधी जिल्हा फंडात नियमबाह्य जमा केला आहे तसेच सदर निधीची देयके कोषागारात सादर करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांची प्रति स्वाक्षरी घेण्याचे निर्देश असताना देयकांच्या स्थळ प्रतिवर प्रतिस्वाक्षरी घेण्यात आलेली नाही, असे आक्षेप लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये घेण्यात आलेले आहेत. सदर आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद धुळे यांचेकडून प्राप्त लेखी माहितीद्वारे खुलासा करण्यात आला आहे की, बालविकास प्रकल्प अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी नव्याने घोषित केल्यामुळे व त्यावेळी त्यांचे बँक खाते उघडण्यात आलेले नसल्यामुळे अंगणवाडी सेविका/मदतनीस मानधन अदायगी करणे तातडीचे असल्याने प्राप्त निधी गट विकास अधिकारी यांचेखाती जमा करून त्वरित अदा करण्यात आलेला आहे. तसेच स्थळप्रतिवर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांची प्रति स्वाक्षरी घेण्याचे अनावधानाने राहून गेले आहे, या जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या खुलाशामुळे शासन निर्णयाबद्दल जिल्हा परिषदेची संपूर्ण अनास्था व उदासिनता दिसून येते. त्यामुळे या प्रकरणी समिती तीव्र नापंसती व्यक्त करीत आहे.

तसेच साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, **जिल्ह्यातील अंगणवाडी पर्यवेक्षिकांची १० पदे रिक्त असून जिल्ह्यात काही शिक्षकांनी अपंग नसतानादेखील अपंगत्वाचे प्रमाणपत्र जिल्हा परिषदेला सादर करून शासनाची फसवणूक केलेली आहे.** याप्रकरणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये नमूद करण्यात आले आहे की, अंगणवाडी पर्यवेक्षिकांच्या १० रिक्त पदांबाबत मुख्य सेविका संवर्गातील भरतीबाबत सेवाशर्ती तयार करण्याचे काम शासन स्तरावर सुरू आहे आणि जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांपैकी १८६ अपंग शिक्षकांमधील १६६ अपंग शिक्षकांनी ऑनलाईन पध्दतीने अपंगत्वाची प्रमाणपत्रे सादर केली आहेत. उर्वरित अपंग शिक्षकांनी ऑनलाईन पध्दतीने अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे, दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी एवढ्या विलंबाने अपंगत्वाबाबत कोणतीही शहानिशा न करता केवळ अपंगत्वाचे लाभ काढून त्यांचे सेवेमध्ये सातत्य ठेवण्यात आले आहे, याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. **संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर व अपंग नसतानादेखील अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणाऱ्या शिक्षकांविरुध्द तसेच अपंगत्वाचे बनावट प्रमाणपत्र देणाऱ्या संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांवर भारतीय दंड विधान कायद्यातील तरतुदींनुसार कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच अपंग शिक्षक भरती प्रकरणी सर्वंकष चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेस्तरावर करण्यात यावी व यासंबंधी करण्यात आलेल्या कारवाईचा अहवाल एक महिन्याच्या आत समितीला कळविण्यात यावा. तसेच भविष्यात असे बनावट अपंगत्वाचे प्रमाणपत्र देऊन नोकरीमध्ये अपंगांसाठी आरक्षित असलेल्या जागांवर नियुक्ती होण्याचे प्रकार पुन्हा होऊ नयेत, म्हणून प्रमाणपत्रे तपासणीसंबंधी ग्रामविकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने सर्वंकष पारदर्शक व स्वयंस्पष्ट धोरण निश्चित करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

**जिल्हा परिषद, धुळे मधील अंगणवाडी पर्यवेक्षिकांची १० रिक्त पदे त्वरित भरण्यासंदर्भात मंत्रालयीन स्तरावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा आणि पूरक पोषण आहार अंगणवाडी सेविका/मदतनीस मानधन इत्यादींबाबत निधीच्या आहरण व संवितरण तसेच लेखांकनातील अनियमिततेप्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, धुळे

## लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणेबाबत.

**(१) परिच्छेद क्रमांक ३.१२(७) (सन २०११-१२)---**

ग्रामपंचायतीचे अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न झाल्याने निकाली काढण्यात आलेल्या ग्रामपंचायत घटकांबाबत.

आदेश क्रमांक ९० खाली प्रलंबित घटक निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील पत्र क्र.लेखाप./२००५/प्र.क्र.२६३०/वित्त-८, दिनांक ०८ सप्टेंबर, २००५ आणि संचालनालय, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई यांचेकडील कार्यालयीन आदेश क्र. ९०, दि.२८ जुलै, २००६ नुसार ग्रामपंचायतींचे अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न झाल्याने सदर कालावधीत झालेला खर्च आक्षेपाधीन ठेऊन स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडून अहवाल निर्गमित करण्यात आले आहेत व त्यानुसार सदरील घटक थकीत घटकामधून कायमस्वरूपी कमी करण्यात आले आहेत.

तथापि, मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई यांचेकडील कार्यालयीन आदेश क्र.१४, दिनांक १९ एप्रिल, २०१० आणि सहमुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी लेखा नाशिक विभाग, नशिक यांच्याकडील परिपत्रक क्र.स्था/१८ब/ग्रांप/लेप/२००७-०८ ते २००९-१०/नवि/१०७९, दि.२७ जुलै २०१० नुसार सन २००७-०८ ते सन २००९-१० या कालावधींच्या लेखा परिक्षणांस मंजूरी दिली असून त्या सोबत सन २००६-०७ पर्यतचे आदेश क्र.९० खालील प्रलंबित घटकांचे लेखापरिक्षण करणेबाबत सूचित केले आहे. त्यानुसार सन २००७-०८ ते २००९-१० या कालावधीतील ग्रामपंचायतींच्या लेखापरिक्षणादरम्यान आदेश क्र.९० खाली निकाली काढण्यात आलेल्या घटकांचे अभिलेखे उपलब्ध करण्यासाठी सरपंच/ग्रामसेवक यांना आगाऊ सूचना पत्रे निर्गमित करूनदेखील अभिलेखे उपलब्ध न झाल्याने लेखापरीक्षण प्रलंबित आहे, दि. ३१ ऑक्टोबर २०१२ अखेर ग्रामपंचायतीकडील ३६३ एकूण १०० घटक प्रलंबित असल्याचे दिसून येते.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १४० नुसार ग्रामपंचायतीचे अभिलेखे लेखापरीक्षणांस उपलब्ध करून देणे तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरीक्षा) नियम १९६१ मधील नियम ९ नुसार ग्रामपंचायतीने लेखापरीक्षणांस अभिलेखे सादर करणे बंधनकारक असतांना लेखापरीक्षणांस सदरचे अभिलेखे उपलब्ध न झाल्याने लेखापरीक्षण प्रलंबित आहे. आदेश क्र.९० खाली निकाली काढलेले घटकांचे अभिलेखे लेखापरीक्षणांस उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :---**

सन २०११-१२ मध्ये ३६३ ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण प्रलंबित असलेबाबत नमूद केले आहे. परंतू सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा, धुळे यांचेकडील पत्र क्र.स्था-१८/ब/ग्रा.पं/९०/धुळे २०२७, दिनांक ०७/०९/२०११ च्या पत्रात नमूद केलेनुसार ताळमेळ घेतला असता, ३६३ ग्रामपंचायती नसून प्रत्यक्षात ३१९ ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण बाकी आहे.

सन २०११-१२ अखेर ३१९ ग्रामपंचायतीचे अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध नव्हते. त्याची सद्य:स्थिती खालील प्रमाणे :---

| अ.क्र. | तपशील | ग्रा.पं.संख्या |
|---|---|---|
| (१) | ३१९ पैकी लेखापरीक्षण झालेल्या ग्रामपंचायती | ९७ |
| (२) | लेखापरिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध असलेल्या ग्रामपंचायतीं. | २१ |
| (३) | चौकशी कामी पोलीस स्टेशनला अभिलेखे जमा असलेल्या ग्रा.पं. | ०९ |
| (४) | बडतर्फ करण्यात आलेले ग्रामसेवकांकडील ग्रामपंचायती | ०८ |
| (५) | मयत झालेले ग्रामसेवकांकडील ग्रामपंचायती | ७१ |
| (६) | लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध न करून दिलेल्या ग्रामपंचायतीं-संख्या | ११३ |
| | **एकूण** | **३१९** |

एकूण ११३ ग्रामपंचायतींचे ग्रामनिधी व ज.रो.यो.चे. अभिलेखे उपलब्ध झाले नाही. मात्र काही ग्रामपंचातीमध्ये ग्रामनिधी ज.रो.यो या दोन्हीची अभिलेखे उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे अशा ग्रामपंचायती दोनदा मोजल्या आहेत. प्रत्यक्षात ११३ प्रकरणांमध्ये ६५ ग्रामपंचायती आहेत.

६५ ग्रामपंचायतीमध्ये ५६ ग्रामसेवक कार्यरत होते. या ५६ ग्रामसेवकांविरुध्द या कार्यालयाचे आदेश क्र.जिपधु/ग्रां.पं./ले.प/८०४/२०१६, धुळे दि.२८ डिसेंबर २०१६ व दि.०३ जानेवारी २०१७ नुसार रु.२५,०००/- दंड वसूल करण्याबाबत आदेश, गट विकास अधिकारी पंचायत समिती, धुळे, साक्री, शिंदखेडा व शिरपूर यांना देण्यात आले असून ५६ ग्रामसेवकांकडून दरमहा रु.१०,९५,५०० दंड वसूल करून शासनसदरी रक्कम भरणा करण्यात आली आहे. काही ग्रामसेवकांकडून दरमहा रक्कम रु.१००० याप्रमाणे हप्त्या-हप्त्याने वसुली सुरु आहे. तसेच सध्या कार्यरत असलेले ५१ ग्रामसेवकांविरुध्द दंडवसुलीची कार्यवाही केलेनंतर अभिलेखे उपलब्ध न करून दिल्यामुळे त्याच ग्रामसेवकांची विभागीय चौकशी सुरू करण्यासाठी प्रस्ताव सादर करणेबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धुळे, साक्री, शिंदखेडा, शिरपूर यांना दिनांक २९ मार्च २०१७ च्या पत्रान्वये कळविणेत आले आहे. कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**(२) परिच्छेद क्रमांक ३.५८३ (सन २०११-१२) :**

जिल्हा परिषद उपकरांतर्गत राखून ठेवलेल्या २० टक्के निधीतून मागासवर्गीय शेतकऱ्यांना १००% अनुदानावर ताडपत्री पुरविणे योजनेतील अनियमितता समाजकल्याण विभागाने आरोग्य विभागाने राबविणेकरीता रुपये ११,९६,८०० एवढा खर्च केलेला आहे याबाबत खलीलप्रमाणे अभिप्राय आहेत ---

(१) योजनेस उक्त ठरावान्वये प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. तथापि, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीअे.२०१०/प्र.क्र./५३८/वित्त-९, दि.१४ जून २०१० अन्वये प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढलेले नाहीत. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास क्र. झेडपीअे.२००८/प्र.क्र./४४४/वित्त-९, दि. १५ जुलै, २००८ अन्वये ताडपत्री खरेदीचे प्रस्तावास सक्षम अधिकारी यांची तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नाही.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शा.नि.क्र. मागास. २००१/प्र.क्र.४०८/३४, दिनांक २०/४/२००१ अन्वये समाजकल्याण समितीने ठरविलेल्या लाभार्थी निकषास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे शासन धोरणानुसार गावातील खऱ्या गरीब लाभार्थ्यांची निवडीचे निकष निर्धारित करून सर्वव्यापी प्रसिध्दी झालेली नसल्याने योजनेपासून मूळ लाभार्थी वंचित राहिला असल्याचे शक्यता नाकारता येत नाही.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास जलसंधारण विभाग, शा. नि. क्र. झेडपीअे. २००८/प्र.क्र/४०८/३४, दि.२० जून २००८ अन्वये योजना राबविण्यासाठी वेळापत्रक निर्धारीत करणेत आलेले आहे. निर्धारीत वेळापत्रकाप्रमाणे लाभार्थी निवड व योजनेची अंमलबजावणी व इतर कार्यवाही विहित वेळापत्रकानुसार करण्यात आलेली नाही.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्र.मागास. १०९८/प्र.क्र. ७३/३४, दि.२० ऑक्टोबर १९९९ अन्वये परिच्छेद क्रमांक ४ अन्वये विवरणपत्र अ मध्ये नोंदवही ठेवून लाभार्थ्यास दिलेल्या सहाय्याची नोंद सदर नोंदवहीमध्ये घेणे आवश्यक आहे. तथापि विवरणपत्र अ मध्ये नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे लाभार्थी दुबार प्रदान झाले किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही. लाभार्थ्याचे प्रस्ताव विभागास प्राप्त झालेबाबत विभागाने आवक नोंदवहीत नोंद केलेली नाही. त्या अभावी लाभार्थी प्रस्ताव कधी व केव्हा प्राप्त झाले याची खात्री करता आली नाही.

(५) संचालक, समाजकल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.सकसं/मावक/का-१२/२०% सेसफंड/२००६-०७/३७१९, दिनांक ११ सप्टेंबर, २००६ परिच्छेद क्रमांक २ नुसार २०% उपकर निधीतुन कोणतीही वैयक्तिक लाभाची योजना राबवितांना लाभार्थ्यांचा १०% हिस्सा घेण्याचे निर्देश दिलेले आहे. तथापि, १० % लाभार्थी हिस्सा न घेता योजना राबविण्यात आलेली आहे. त्यामुळे १०% लाभार्थी हिस्सा प्रतिलाभार्थी रुपये ७०४ या प्रमाणे एकूण १७० लाभार्थ्यांची एकूण हिश्श्याची रक्कम रुपये १,१९,६८० इतका खर्च जिल्हा परिषदेने केल्याचे दिसून येते.

(६) संचालक, उद्योग ऊर्जा विभाग, मुंबई क्र. एसपीसी/आरजीटी/ताडपत्री प्लास्टीक /२०/२०११-१२/बी-१७१४७ दि. ६ सप्टेंबर, २०११ अन्वये दि. ६ सप्टेंबर, २०११ ते ३० जून, २०१२ या कालावधीसाठीच्या दर कराराप्रमाणे हायडेन्सिटी पॉलिथीलियन ओव्हन फॅब्रिक ताडपत्री पुरवायची असतांना पुरवठा चलन ईनव्हॉईस टॅक्सची पडताळणी केली असताना प्रत्यक्षात एचडीपीई आयएसआय प्लॉस्टिक ताडपत्री पुरविण्यात आलेली आहे. यावरून शासनाचा ज्या वस्तूसाठी दर करार करणेत आलेला आहे, तीच वस्तु पुरविणेत आलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद, व पंचायत समित्या लेखा संहिता, १९६८ चे नियम ८३ (३) नुसार ताडपत्री खरेदीपूर्वी तपासणी करून द्यावयाचे प्रमाणपत्र दिलेले नाही. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मांखस १०८८/(२५१२)/उद्योग -६ दि. २ जानेवारी १९९२ परिच्छेद क्रमांक ८.६ नुसार सूचित केल्या प्रमाणे माल पुरवठ्याचे ठिकाणी पोहोचल्यावर मालाचे त्वरित निरीक्षण केले जाणे आवश्यक आहे. त्रयस्थ यंत्रणेकडून तपासणी केल्याबाबतचा अहवाल घेतलेला नाही. ताडपत्रींचा पुरवठा हा गट स्तरावर केलेला असल्यामुळे पुरवठा झालेली ताडपत्री विहित केलेल्या आकाराची व विनिर्देशानुसार प्राप्त झाल्याचे संबंधित अधिकारी यांनी प्रमाणित केलेले नाही. करारनुसार विहित विनिर्देशातील ताडपत्रीचा पुरवठा न झाल्यामुळे सदरील खर्चाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

(७) ताडपत्री पुरवठा तालुकास्तरावर पुरवठादाराकडून करणेत आलेला आहे. पुरवठा आदेशानुसार ताडपत्री ३० दिवसांत पुरवठा करणे क्रमप्राप्त असतांना शिंदखेडा गटास १३ दिवस विलंबाने ताडपत्रीचा पुरवठा केलेला आहे. त्यामुळे विलंबाबाबत पुरवठाधारकाकडून रुपये १३०० वसूल करण्यात यावे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र. पंरास-१०९६/प्र.क्र. १७८, दि. ९ ऑक्टोबर १९९७ मधिल परिच्छेद क्रमांक ५ अन्वये साहित्य ज्या वित्तीय वर्षात खरेदी केले असेल त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे बंधनकारक आहे. पंचायत समिती, शिंदखेडा अंतर्गत ३८ ताडपत्रींची साठा नोंदवहीत नोंद घेण्यात आलेली आहे. सदर साठा नोंदवहीमध्ये रकाना क्रमांक ९ ते ६ अन्वये मंजूर लाभार्थ्यास योजनेचा लाभ देऊन विनियोग नोंदविणे आवश्यक असतांना, वाटप साहित्याची स्वतंत्र नोंदवही ठेवलेली आहे. सदरची बाब अनियमित दिसून येते. पंचायत समिती, धुळेला ४० ताडपत्रींचा पुरवठा केलेला असतांना लाभार्थ्यांना केवळ १५ ताडपत्री वाटप केलेल्या आहेत. पंचायत समिती, शिंदखेडाला ३८ ताडपत्री पुरवठा केलेला असतांना लाभार्थ्यांना केवळ २८ ताडपत्री वाटप केलेल्या आहेत. धुळे व शिंदखेडा गटाने शिल्लक एकूण ३५ ताडपत्री वाटप न केल्यामुळे २०% मागासवर्गीय लाभाच्या योजनेवर प्रतिताडपत्री रु. ७०४० प्रमाणे रु. २,४६,४०० वस्तुत: विनियोग झालेला नसून, केवळ कागदोपत्री खर्च झालेला आहे. परिणामी मागासवर्गीय लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेले आहेत.

(८) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास. १०१३/प्र.क्र. १२३९/३४/ दिनांक १ सप्टेंबर १९९३ मधील परिच्छेद क्रमांक ४ नुसार वाटप साहित्याची गटविकास अधिकारी/सक्षम अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून व लाभार्थ्यांना योजनेचा प्रत्यक्ष फलश्रुती अहवाल तयार करणे आवश्यक आहे. तथापि, असा अहवाल तयार केलेला नसल्याचे दिसून येते.

(९) ताडपत्री वाटप प्रस्तांवांची पडताळणी केली असता, प्रस्तावामध्ये सदरील अनियमितता असतांना, लाभार्थी निवड करणेत आलेली आहे. याबाबत संबंधित विहित लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिल्याबाबत कागदपत्रांची पूर्तता करून सक्षम अधिकारी याची मान्यता दर्शविणे आवश्यक आहे. बनावट लाभार्थी आढळून आल्यास, प्रदान केलेल्या लाभाची रक्कमही वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :--**

(१) मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचे आदेश क्र. जिपधु/ सकवि / योजना/५८४/२०११ दि. २६ सप्टेंबर २०११ अन्वये प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. तसेच मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचे आदेश क्र. जिपधु/सकवी / योजना/५८३/२०११, दि २६ सप्टेंबर २०११ अन्वये तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे. आदेशाची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. मागास-२००१ प्र.क्र. ४०८ दि. २० एप्रिल २००१ अन्वये समाजकल्याण समितीने ठरविलेल्या लाभार्थी निकषास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि. २७ मार्च २०१२ ठराव क्र. २०५ अन्वये मान्यता घेण्यात आली असून लाभार्थी निवडीसाठी स्थानिक वर्तमानपत्रात सर्वव्यापी प्रसिध्दी देण्यात आली आहे. त्यामुळे योजनेपासून मूळ लाभार्थी वंचित राहिलेला नाही.

(३) सदर योजनेतील बहुतांश लाभ त्याच आर्थिक वर्षात लाभार्थ्यांना देण्यात आलेला आहे यापुढे वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येईल.

(४) विवरणपत्र अ मध्ये नोंदवही ठेवण्यात आली असून दुबार लाभ दिलेला नसल्याची तालुकास्तरासह मुख्यालय स्तरावरही खात्री करण्यात आली आहे. तसेच यापुढे आवक नोंदवहीमध्ये प्रस्ताव प्राप्त झालेबाबत नोंद घेण्याची दक्षता घेण्यात येईल.

(५) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबईकडील शासन निर्णय क्र. मागास. १०९८/प्र.क्र. ७३/७४, दि. २० ऑक्टोबर १९९९ अन्वये योजना राबविणेबाबत मार्गदर्शक सुचना अन्वये लाभार्थी हा दारिद्रयरेषेखालील असावा असे नमूद असून सदर योजना राबविणेसाठी १०% लाभार्थी हिस्सा घेणेत यावा अशी अट नमूद नसल्याने १०% लाभार्थी हिस्सा घेता येत नाही.

(६) दर कराराप्रमाणे आयएसआय मार्क हायडेन्सिटी पॉलिथीलीन ओव्हन फॅब्रिक ताडपत्रीच (प्लास्टीक) पुरविण्यात आलेली असून खरेदीपुर्वी तपासणी करून द्यावयाचे प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. ताडपत्री विहित केलेल्या आकाराची व विनिर्देशानुसारच प्राप्त झालेबाबत त्यानुसार दर करारात विहित केलेल्या आकाराची विनिर्देशाप्रमाणेच साहीत्य प्राप्त झाल्याने पुरवठाधारकांकडून वसुली करता येत नाही.

(७) पुरवठा आदेश दि. १६ जानेवारी २०१३ रोजी निर्गमित करण्यात आला असून ३० दिवसांच्या आत दिनांक ७ फेब्रुवारी २०१२ रोजी पंचायत समिती, शिंदखेडा येथे ताडपत्रीचा पुरवठा केला आहे. मुदतीत साहीत्य प्राप्त झाल्याने वसुलीचा प्रश्न उद्भवत नाही. लाभार्थ्यांनी वस्तु ताब्यात घेतेवेळी करून द्यावयाचा करारनामा वेळेवर करून दिले नसल्यामुळे साहित्य वाटप करणे शिल्लक होते. परंतु सदर लाभार्थ्यांनी तद्नंतर करारनामा करून दिला असून पंचायत समिती, धुळे-२५, पंचायत समिती,

शिंदखेडा-१० असे एकूण ३५ लाभार्थ्यांना साहित्यांचे वाटप करण्यात आलेले असून साहित्य वाटप रजिस्टर मध्ये नोंद घेऊन स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. परिणामी मागासवर्गीय लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेला नाही.

(८) फलश्रुती अहवाल दप्तरी उपलब्ध आहे.

(९) ताडपत्री लाभार्थी प्रस्तांवांची पडताळणी केली असून प्रस्ताव परिपूर्ण असून बनावट लाभार्थी आढळून आले नाही. परिणामी लाभाची रक्कम वसूल करता येत नाही.

**(३) परिच्छेद क्रमांक ४.२७२/३ (सन २०११-१२)**

पंचायत समिती उपकराअंतर्गत राखून ठेवलेल्या २० टक्के निधीतून मागासवर्गीय लाभार्थ्यांना घरगूती वापरासाठी सौर कंदिल वाटप करणे योजनेतील अनियमितता.

पंचायत समिती, शिरपूर, जि. धुळे सन २०११-१२ उपरोक्त योजनेवर प्रमाणक क्र. ३ दि. १३/०३/२०१२ अन्वये रुपये ६,३०,४०० एवढा खर्च केला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) योजनेस उक्त ठरावान्वये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे. तथापि, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१०/ प्र.क्र.५३८/वित्त-९  दि.१४/०६/२०१० अन्वये प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचे आदेश काढलेले नाहीत.

(२) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९ दिनांक २०/०६/२००८ मधील मुद्दा क्र.३ मध्ये नमूद केल्या प्रमाणे व त्या सोबतचे परिशिष्ट इ नुसार वैयक्तीक लाभाच्या योजनांसाठी लाभार्थ्यांची निवड व साहित्य वाटप करणे बाबतचे वेळापत्रक निश्चित करून, संबंधित योजनेचा लाभ वित्तीय वर्षाचा ३० नोव्हेंबर पर्यंत लाभार्थीस प्रदान करणे आवश्यक आहे. लाभार्थींना निवड यादी लेखा परीक्षणात उपलब्ध झाली नाही. तथापि लाभार्थी निवड ही दिनांक २५/०२/२०१२ रोजीच्या सभेमध्ये करणेत आलेली आहे. पुरवठा आदेश दिनांक १४/०२/२०१२ रोजी देऊन मालाचा पुरवठा दिनांक ७/३/२०१२ रोजी झालेला आहे. प्राप्त साहित्य त्यानंतर वाटप केलेले आहे. त्यामुळे पुरवठा आदेशानंतर लाभार्थी निवड करणेत आलेली आहे.

(३) एकूण प्राप्त सौर कंदिल १९७ पैकी दिनांक ३१/३/२०१२ रोजी अखेर १८६ एवढेच सौर कंदिल वाटप केलेले असून उर्वरित ११ सौर कंदिल जून २०१२ अखेरपावेतो वाटप केलेले आहे. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.मागास १०९३/प्र.क्र.१२३९ अन्वये ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले ते त्याच वर्षात वाटप करणे बंधनकारक असताना, तसे केल्याचे दिसून येत नाही.

(४) महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मुंबई शासन निर्णय क्र. १०८८/(२५१२) उद्योग-६, दिनांक २/१/१९९२ परिच्छेद क्र. ८.६ नुसार सूचित केलेप्रमाणे माल पुरवठ्याचे ठिकाणी पोहोचल्यावर मालाचे त्वरीत निरिक्षण केले जाणे आवश्यक आहे. प्राप्त सौर कंदिल विनिर्देशाप्रमाणे प्राप्त पुरवठ्याची खात्री करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, १९६८ चे नियम ८३ (३) नुसार खरेदी पूर्वी तपासणी करून दयावयाचे प्रमाणपत्र दिलेले नाही.

(५) दर करारातील शर्ती व अटी क्र. १३ (ए) व १३ (बी) नुसार मालाचा पुरवठ्यानंतर अनुक्रमे ९० टक्के व १० टक्के याप्रमाणे रकमा प्रदान करावयाचा असताना उपरोक्त प्रमाणे १०० टक्के प्रदान करण्यात आलेली आहे.

(६) सौर कंदिल पुरवठा आदेश दिनांक १४/२/२०१२ रोजी देण्यात आलेले आहेत, तथापि, रु.१०० चे मुद्रांकावर करारनामा दिनांक ७/३/२०१२ रोजी म्हणजे पुरवठा प्राप्त झाल्याच्या दिनांकास करणेत आलेला आहे. योजनेचा लाभाची खरेदी पूर्वी करावयाचा शर्ती अटी ह्या मालाच्या खरेदी नंतर केल्याचे दिसून येते.

(७) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. मागाव/ परास/ १०९८/ प्र.क्र. ७३, दिनांक २०/१०/१९९९ अन्वये लाभार्थी निवड केले बाबत प्रपत्र-३ मध्ये नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्याअभावी लाभार्थीस योजनेचा दुबार फायदा झालेबाबत पडताळणी करता आली नाही.

(८) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.मागास-१०९३ /प्र.क्र.१२३९/३४ दिनांक ०१/०९/१९९३ मधील परिच्छेद क्रमांक ४ नुसार वाटप साहित्याची गटविकास अधिकारी / सक्षम अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून व लाभार्थ्यांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ झाला असलेबाबत व फलश्रुती बाबत अहवाल तयार करणे आवश्यक आहे, तथापि, असा अहवाल तयार करण्यात आलेला नाही.

(९) योजनेच्या लाभार्थी निवड बाबत ग्रामसभेचा ठराव क्र. व दिनांक प्रस्ताव सोबत आढळून आला, सदर योजनेचे व्यतिरिक्त अन्य योजनेतून वैयक्तीक लाभ दिलेला नसलेबाबत प्रमाणपत्र कागदोपत्री आढळून आलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदरची योजना राबविणेसाठी पंचायत समिती, शिरपूर यांनी तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी देण्यासाठी कार्यालयीन टिपणी मंजूर केलेली आहे. आदेश निर्गमित केलेले असून, नस्तीस जोडणे बाकी होते, सदरचे आदेश नस्तीस जोडण्यात आले आहेत.

(२) सन २०११-१२ या कालावधीत शिरपूर तालुक्यात ग्रामपंचायत निवडणूक असल्याने, निवडणुकीची आचारसंहिता दिनांक २५ जानेवारी २०१२ पासून लागू असल्याने, सदर योजनेतील लाभार्थ्यांची निवड करता आली नाही, सदरची योजना त्याच आर्थिक वर्षात राबविण्यात आलेली आहे. तसेच आक्षेपात नमूद केलेप्रमाणे दिनांक २५ फेब्रुवारी २०१२ रोजी पंचायत समितीची कोणतीही सभा झालेली नाही व सदर योजनेला दिनोक १८ नोव्हेंबर २०११ ठराव क्रमांक ५३१ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. व दि.१७ डिसेंबर २०११ ठराव क्रमांक ५३५ अन्वये लाभार्थी यादीला मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने दि.१४ फेब्रुवारी २०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. यापुढे शासन निर्णयाप्रमाणे योजना राबविणेची दक्षता घेणेत आलेली आहे.

(३) सदर योजनेत ११ लाभार्थ्यांनी करारनामे उशिरा सादर केल्याने, त्यांना दिनांक ३१/०३/२०१२ नतर सौरकंदिल वाटप केलेले आहेत. सर्व लाभार्थ्यांना साहित्य वाटप केलेबाबत नोंद वाटप नोंदवहीमध्ये घेण्यात आलेली आहे. पूर्ण साहित्याचे वाटप झालेले आहे.

(४) साहित्य पुरवठ्याच्या ठिकाणी पोहोचल्यावर मालाचे निरीक्षण करण्यात आलेले असून, सौर कंदिल निर्देशाप्रमाणे प्राप्त झाल्याची खात्री करण्यात आलेली आहे. व तशी नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आली आहे. पुरवठा साहित्य सुस्थितीत प्राप्त झाले बाबत गट विकास अधिकारी यांनी प्रमाणित केले आहे.

(५) शासन दर करारानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे साहित्य प्रदान झाले होते व सदर साहित्य चाचणी अहवाल देखील प्राप्त झालेला असल्याने १००% रकमेची अदायगी करण्यात आली आहे.

(६) पुरवठा देताना अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत. पुरवठा आदेशात ज्या अटी व शर्ती आहेत त्याच करारनाम्यात समाविष्ट आहेत. पुरवठा आदेशात अट क्र.६ नुसार रु.१०० च्या मुद्रांकावर करारनामा करून देणे बंधनकारक राहिल अशी अट नमूद केलेली आहे, यास्तव यापुढे मालाची खरेदी करणेपूर्वी करारनामा करण्याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

(७) प्रपत्र-३ मध्ये नोंदवही ठेवणेत आलेली आहे व सन २००७-०८ ची नियंत्रण वहीनुसार लाभार्थ्यास दुबार लाभ देण्यात आलेला नसलेबाबत खात्री केली आहे.

(८) लाभार्थ्यांना वाटप केलेल्या साहित्याचा वापर सर्व लाभार्थी करीत असल्याची खात्री करणेत आली असून, फलश्रुती अहवाल दप्तरी उपलब्ध आहे.

(९) लाभार्थ्यांच्या प्रस्तावात संबंधीत लाभार्थ्यास सदरचा लाभ कोणताही अन्य योजनेतून दिला नसलेबाबतचे संबंधीत ग्रामसेवकांचे प्रमाणपत्र (दाखला) वेळीच घेण्यात आला आहे व दप्तरी उपलब्ध आहे.

वरीलप्रमाणे खुलासा मान्य होणेस विनंती.

**(४) परिच्छेद क्रमांक ५.५०/३ (सन २०११-१२)**

ग्रामपंचायतीमधील इतर अनियमितता :-

| अ.क्र. | नियम बाह्य बाबीचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | ग्रामपंचायतीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक व लेखापरिक्षण अहवाल वर्ष | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | अभिलेखे उपलब्ध नसणेबाबत | धुळे | शिंदखेडा | विरदेल | २<br>२००७-०८ ते २००९-१० | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

ग्रामपंचायत विरदेल, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील सन २००७-०८ ते २००९-१० या कालावधीचे दप्तर लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आले असून पुढील आर्थिक वर्षात लेखा परिक्षण करण्यात आले आहे. कृपया खुलासा मान्य होणेस विनंती.

**(५) परिच्छेद क्रमांक ३.६५ (सन २००८-०९)**

**४% सादील अनुदानातुन डयुअेल डेक्स (बेंच) खरेदी मधील अनियमितता :-**

सन २००८-०९ या वित्तीय वर्षासाठी, धुळे जिल्हा परिषदेने चालविलेल्या प्राथमिक शाळांना ४ टक्के सादील अनुदान रुपये ३६.०३ लक्ष मात्र शिक्षण उपसंचालक, (प्राथ.)-महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्र क्रं.बीयुडी/ २००८-०९/प्राशिसं-२००(१) दिनांक १६/७/२००८ अन्वये प्राप्त झाले असून सदरचा निधी महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग शासन, निर्णय क्रं. पीआरई-१०९४/७०४/दोन/पाशि-१/दि.१४/११/१९९४ अन्वये खर्च करणेस मान्यता दिली आहे. त्यानुसार शाळास्तरावर रक्कम रुपये २८,८२,४०० मात्र खर्च करण्यास ४ गटांना वित्त प्रेषण आदेश दिनांक २/३/२००९ अन्वये वितरीत करणेत येऊन उर्वरित २० टक्के रक्कम रुपये ७,२०,६०० जिल्हा स्तरावर गट निकाय शाळांमध्ये डयुअेल डेक्स (बेंच) प्रति नग रुपये २,५५५ प्रमाणे २८२ नग खरेदीवर रक्कम रुपये ७,२०,५१० इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

(१) उपरोक्त शासन निर्णय दिनांक १४/११/१९९४ मधील मुद्दा क्र. ४ नुसार, जिल्हा स्तरावर करावयाच्या २०% खर्चा पैकी निम्मी रक्कम शाळा दुरुस्ती करिता राखून ठेवावी व उर्वरित रक्कमेतून प्रपत्र ब मध्ये नमूद केलेल्या साहित्यावर खर्च करणे बाबत निर्देश असतांना जिल्हा परिषदेने उपलब्ध निधी पैकी २० टक्के रक्कम रू.७,२०,५१० ही प्रपत्र ब नुसार ड्युअेल डेक्स (बेंच) खरेदी करीता खर्ची टाकून शासन निर्देशांचे उल्लंघन केलेले आहे.

(२) गटातील कोणत्या शाळांवर ड्युअेल डेक्स बेंच पुरवठा करण्यात आला याबाबत अहवाल दप्तरी उपलब्ध झाला नाही.

(३) खरेदी केलेल्या एका ड्युअेल डेक्सवर ३ विद्यार्थी बसण्याची क्षमता आहे. त्यानुसार वाटप केलेल्या शाळा करिता इ.१ ली ते ४ थी च्या कोणत्या वर्गासाठी बेंच पुरविले आहेत, त्याची पट संख्या व वाटपाचे प्रमाण याचा अहवाल दप्तरी उपलब्ध झाला नाही.

(४) सन २००७-०८ मधील अखर्चित रक्कम रु.५४७ आणि या वित्तीय वर्षातील रु.९० अशी एकूण अखर्चीत रक्कम रु.६६४ शासन जमा केली नाही.

(५) साहित्याचा पुरवठा प्राप्त झाले बाबत व जंगम मालमत्ता नोंदवहीत नोंदी घेतले बाबत तसेच वाटप केलेल्या शाळा निहाय पोहच पावती व उपयोगिता प्रमाण पत्र दप्तरी उपलब्ध नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) जिल्हा परिषदने चालविलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी तालुका स्तरावरुन २६,५४२ एवढया डयुअेल डेक्सची मागणी होती. त्यामुळे विद्यार्थ्यांची बसण्याची गैरसोय होऊ नये म्हणून ४% सादिल अनुदानातून जिल्हा स्तरवर करावयाच्या २०% खर्चापैकी संपूर्ण रक्कम शासन निर्णय दिनांक १४/११/१९९४ मधील प्रपत्र ब मध्ये नमूद ड्युअेल डेक्स (बेंच) खरेदी करण्यासाठी वापरण्यात आली आहे. तसेच सन २००८-०९ या वर्षात सर्व शिक्षा अभियान योजनेतून शाळा दुरुस्तीसाठी रुपये १६.०७ लक्ष एवढा निधी प्राप्त झाला होता व सदर निधी शाळा दुरुस्तीसाठी पुरेसा होता. विद्यार्थ्यांना बसण्यासाठी जास्त बेंचेस उपलब्ध व्हावेत म्हणून शाळा दुरुस्तीसाठी निम्मे रक्कम खर्च न करता ड्युअेल डेक्स खरेदी करण्यासाठी वापरण्यात आली आहे. सन २००८-०९ या वर्षात १४ शाळांनी दुरुस्तीची मागणी केली होती व सदर दुरुस्तीसाठी प्राप्त निधी रु. १६.०७ लक्ष मधून रु. १४.१५ लक्ष एवढा खर्च करण्यात आला आहे. शाळांनिहाय दुरुस्तीवर केलेल्या खर्चाची यादी दप्तरी उपलब्ध आहे. याबाबत मा.शिक्षण संचालक (प्राथ.), पुणे यांच्याकडे कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र/धुजिप/शिविपप्रा/नियोजन/३७६ दि.३१/१२/२०१६ अन्वये पाठविण्यात आला आहे. तसेच दि. ०३/०२/२०१७ रोजी स्मरण पत्र देण्यात आले आहे.

(२) गटातील खालील शाळांना ड्युअेल डेस्क बेंचेसचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

(१) **साक्री** - पारगांव- १० बेंच, दापूर-१० बेंच, चोरवड-१० बेंच, लोणश्वरी -१० बेंच, शिवाजीनगर - १० बेंच, पापडीपाडा-१० बेंच, शेवगे-०५ बेंच, साक्री मुले-१० बेंच, महाड्याचापाडा-१० बेंच, नवापाडा (अंबूर)-०५ बेंच फोफरे-१० बेंच.

(२) **शिरपूर-** बोरडी मुले-०९ बेंच बोराडी मुली-०९ बेंच, होळ-११ बेंच, सामऱ्यापाडा-१५ बेंच, तऱ्हाडी-१० बेंच, खामखेडा प्र.आ-०९बेंच.

(३) **धुळे** - सोनगीर-१५ बेंच, अनकवाडी-१५ बेंच, नेर नं.४-१५ बेंच, सरवड-१५ बेंच.

(४) **शिंदखेडा** - दभाशी-१० बेंच, विरदेल-१० बेंच, पढावद-१० बेंच, वाघाडी खु-१० बेंच, मालपूर नं.१- १० बेंच, निमगुळ-१० बेंच वरीलप्रमाणे पुरवठा केल्याचा अहवाल दप्तरी उपलब्ध आहेत.

(३) खरेदी केलेल्या एका ड्युअेल डेक्स बेंचवर ३ विद्यार्थी बसण्याची क्षमता असून सदर बाकांचा वापर इयत्ता ३ री व त्यापुढील वर्गांसाठी करण्यात येत आहे. त्या शाळांची पटसंख्या व वाटपाचे प्रमाण दप्तरी उपलब्ध आहेत. सदर बाकांचा वापर विद्यार्थ्यांना बसण्यासाठी होत असून त्याचे पुरावे म्हणून छायाचित्र दप्तरी उपलब्ध आहेत.

(४) सन २००७-०८ मध्ये अखर्चित रक्कम रु.५७४ आणि सन २००८-०९ या वर्षातील रु. ९० अशी एकूण अखर्चित रक्कम रुपये ६६४ शासन सदरी भरणा केली आहे. भरणा केल्याचे चलन दप्तरी उपलब्ध आहे.

(५) साहित्याचा पुरवठा प्राप्त झालेबाबत व जंगम मालमत्ता नोंदवहीत नोंदी घेतल्याबाबत नोंदवहीच्या छायांकित प्रती दप्तरी उपलब्ध आहेत. तसेच शाळनिहाय पोहच पावती व उपयोगिता प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध आहेत.

**(६) परिच्छेद क्रमांक ३.१०३७ (१३) (सन २००८-०९)**

**जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षणांचे काम करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधित आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समिती यांना कळविण्यात येते त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्याच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो तरीसुद्धा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात अश्या प्रकारचे परिच्छेद लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व मुख्य लेखा वित्त आधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते.

तथापि, या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांर्भीयाने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदारणादाखल जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्यांबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहे.

| अ.क्र. | जि. प. चे नांव | जि. प. चा. विभाग | ले.प. अहवालातील परिच्छेद क्र. | गुतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १३ | धुळे | सामान्य प्रशासन | ०३ | -- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, धुळे यांचेकडील दि.५/५/२००९ च्या १७३ ग्रामपंचायतीचे अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाले नव्हते त्याची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | ग्रा.पं. संख्या |
|---|---|---|
| १ | १७३ पैकी आता पावेतो लेखापरीक्षण झालेल्या ग्रामपंचायती | ३९ |
| २ | लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध असलेल्या ग्रामपंचायती | १४ |
| ३ | चौकशी कामी पोलीस स्टेशनला अभिलेखे जमा असलेल्या ग्रामपंचायती | ०५ |
| ४ | बडतर्फ करण्यात आलेले ग्रामसेवकांकडील ग्रामपंचायती | ०६ |
| ५ | मयत झालेल्या ग्रामसेवकांकडील | ४४ |
| ६ | लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध न करून दिलेल्या ग्रामपंचायर्ती संख्या | ६५ |
| | **एकूण** | **१७३** |

६५ ग्रामपंचायतीमध्ये ५६ ग्रामसेवक कार्यरत होते. या ५६ ग्रामसेवकांविरुध्द या कार्यालयाचे आदेश क्र.जिपधु/ग्रा.पं/ले.प/८०४/२०१६ धुळे दिनांक २८/१२/२०१६ व दि.३/१/२०१७ नुसार रु.२५००० दंड वसूल करण्याबाबत आदेश गट विकास अधिकारी पंचायत समिती धुळे, साक्री, शिंदखेडा व शिरपूर यांना देण्यात आले असून ५६ ग्रामसेवकांकडून रु.१०,९५,५०० दंड वसूल करून शासन दप्तरी रक्कम भरणा करण्यात आली आहे. काही ग्रामसेवकांकडून दरमहा रु.१००० याप्रमाणे हप्त्या-हप्त्याने वसुली सुरु आहे. तसेच सध्या कार्यरत असलेले ५१ ग्रामसेवकांविरुध्द दंड वसुलीची कार्यवाही केलेनंतर अभिलेखे उपलब्ध न करून दिल्यामुळे त्याच ग्रामसेवकांची विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी प्रस्ताव सादर करणे बाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धुळे, साक्री, शिंदखेडा, शिरपूर, यांना दिनांक २९.३.२०१७ च्या पत्रान्वये कळविणेत आले आहे.

**(७) परिच्छेद क्रमांक ३.१०३७ (१४) (सन २००८-०९)**

**जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षणांचे काम करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधित आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंघित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समिती यांना कळविण्यात येते त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो तरीसुद्धा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परीक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व मुख्य लेखा वित्त आधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते.

तथापि, या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांर्भीयाने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहे.

| अ.क्र. | जि. प. चे नांव | जि. प. चा. विभाग | ले.प. अहवालातील परिच्छेद क्र. | गुतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १४ | धुळे | ग्रामीण पाणीपुरवठा | २७ | ११,१४,२६,८८६ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर मुद्याबाबत खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडील शासन निर्णय दिनांक ३/०९/२००१ व दिनांक ०८/१०/२००३ नुसार ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती मार्फत योजना राबविणेत आली आहे. तसेच शासन निर्णयातील २१/०८/२००६ नमूद सूचनेनुसार सदर योजनेच्या अभिलेख्याचे लेखापरिक्षण सनदी लेखापाल यांच्याकडून करून घेण्याबाबत सूचित केले आहे. त्याअनुषंगाने या परिच्छेदात नमूद सर्व योजनांचे लेखापरिक्षण लेखापाल यांच्याकडून करून घेण्यात आले आहे.

व लेखापरिक्षण अहवाल नस्तीबध्द असून कार्यालयात उपलब्ध आहेत. या लेखापरिक्षण अहवालात गंभीर आक्षेप आढळून आलेले नाहीत. योजनांचे दप्तर व सर्व लेखे हे ग्रामस्तरावर समितीच्या अखत्यारित असल्याने जि.प.स्तरावर झालेल्या लेखापरिक्षणास जि.प. स्तरावर उपलब्ध असलेले अभिलेखे दाखविण्यात आले आहे.

**(८) परिच्छेद क्रमांक ३.१०३७ (१५) (सन २००८-०९)**

**जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षणांचे काम करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधीत आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधीत जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समिती यांना कळविण्यात येते त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्याच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो तरीसुध्दा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व मुख्य लेखा वित्त आधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते.

तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांर्भीयाने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधीत जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदारणादाखल जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत घेतलेले आक्षेप खालीदर्शविण्यात आले आहे.

| अ.क्र. | जि. प. चे नांव | जि. प. चा. विभाग | ले.प. अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १५ | धुळे | आरोग्य विभाग | १३ | ९४,५४४ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २००८-०९ चे लेखापरिक्षणासाठी परिच्छेदात नमूद दप्तर उपलब्ध करून देता आले नाही. तथापि, तालुका आरोग्य अधिकारी साक्री, शिरपूर, धुळे, शिंदखेडा व आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, धुळे यांचे कडील वाहन लेखे पेट्रोलसाठा रजिस्टर, लॉगबुक व हिस्ट्री शिट अद्ययावत असून दप्तरी उपलब्ध आहेत.

**(९) परिच्छेद क्रमांक ४.१६८/१८ (सन २००८-०९)**

**प्राथमिक आरोग्य केंद्र, दुसाणे यांचेकडील लेख्यांबाबत :-**

प्राथमिक आरोग्य केंद्र, दुसाणे यांचे कडील रोकडवही तपासणी केली असता याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) रोकड वहीत सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी घेण्यात आलेल्या नाहीत.

२) आरोग्य केंद्राकडील साठा नोंदवही / डेडस्टॉक उपलब्ध झाले नाही.

३) आरोग्य केंद्राकडील वाहनाचे लेखे (लॉगबुक, हिस्ट्री शिट इ.) लेखा परिक्षणात उपलब्ध झाले नाही.

४) आक्षेपात नमूद केले प्रमाणे खर्चाचे प्रमाणके लेखापरिक्षणात उपलब्ध झालेले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

प्राथमिक आरोग्य केंद्र, दुसाणे, ता.साक्री येथील लेखाबाबत सन २००८-०९ चे लेखापरिक्षणात आक्षेप नोंदविणेत आलेले आहेत सदर आक्षेपाचे अनुपालन खालीलप्रमाणे आहे.

१) प्राथमिक आरोग्य केंद्र, दुसाणे येथील रोकड नोंदवहीमध्ये वैद्यकीय अधिकारी यांची स्वाक्षरी घेणेत आलेली असून सन २००८-०९ व २००९-१० चे लेखापरिक्षण सन २०१०-११ मध्ये करून घेण्यात आलेले आहे.

२) साठा नोंदवही डेडस्टॉक उपलब्ध करणेत आलेली असून सन २००८-०९ व २००९-१० चे लेखापरिक्षण सन २०१०-११ मध्ये करून घेण्यात आलेले आहे.

३) प्राथमिक आरोग्य केंद्राकडील वाहनाचे लेखे (लॉगबुक हिस्ट्रीशिट) उपलब्ध आहे. तसेच सन २००८-०९ व २००९-१० चे लेखापरिक्षण सन २०१०-११ मध्ये करून घेण्यात आलेले आहे.

४) सन २००८-०९ व २००९-१० चे लेखापरिक्षण सन २०१०-११ मध्ये करून घेण्यात आलेले आहे. सर्व प्रमाणके दप्तरी उपलब्ध आहेत.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**(१०) परिच्छेद क्रमांक ४.३४७/१२ (सन २००८-०९)**

**पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमांचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गाभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जि.प. विभाग व पं.स. यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायत राज संस्थांच्या निर्देशनास येत आहे. उदाहरणादाखल पं.स. यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहे.

| अ.क्र. | जिल्ह्यांचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १२ | धुळे | धुळे | ३० (अ) | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती, धुळे कडील सन २००८-०९ मध्ये ४० ग्रामपंचायतीनी लेखापरिक्षणासाठी एकूण १५४ घटकांचे अभिलेखे उपलब्ध केलेले नाहीत. त्याची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | ग्रा.पं. | घटक |
|---|---|---|---|
| १. | लेखा परिक्षणासाठी उपलब्ध केलेले अभिलेखे व लेखा परिक्षण झालेल्या ग्रा.प. | २ | २ |
| २. | लेखा परिक्षणासाठी उपलब्ध असलेले अभिलेख व ग्रा.प. | १ | २ |
| ३. | अभिलेखे उपलब्ध न केल्याने बडतर्फ केलेले कर्मचारी ग्रा.प. प्रकरण | १ | १ |
| ४. | विभागीय खाते चौकशी सुरु केलेली प्रकरण | ६ | २३ |
| ५. | दंडात्मक कार्यवाही प्रकरणे | ६ | ३४ |
| ६. | प्रलंबित प्रकरणे | २४ | ९२ |
| ६-अ | मयत ग्रा.से. कडील प्रकरणे | १८ | ६२ |
| ६-ब | नाटीस बजावलेले प्रकरणे | ६ | ३० |

उपलब्ध असलेल्या ग्राम पंचायतीच्या अभिलेख्याचे लेखा परिक्षण करून घेण्यात येइल. कृपया खुलासा मान्य होणेस विनंती.

**(११) परिच्छेद क्रमांक ४.३४७/१३ (सन २००८-०९)**

**पंचायत समित्यांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखा परिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमांचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गाभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जि.प. विभाग व पं.स. यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायत राज संस्थांच्या निर्देशनास येत आहे. उदाहरणादाखल पं.स. यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहे.

| अ.क्र. | जिल्ह्यांचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १३ | धुळे | शिरपूर | ४२ (अ) | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती, शिरपुर कडील सन २००८-०९ मधील परिच्छेदात नमूद केलेल्या अभिलेख उपलब्ध न केलेल्या ग्रामपचायतीची संख्या ०९ आहे. या ०९ संबंधीत ग्रामसेवक यांना नोटीस बजावण्यात आली असून, त्यांनी लगतच्या सन २०१०-११ या आर्थिक वर्षात लेखापरिक्षण केलेले आहे. लेखापरिक्षण केलेबाबत व या लेखापरिक्षणात परिच्छेद प्रलंबित नाही असे लेखी पत्र ग्रामपंचायतीने दिले आहे. व त्याची प्रत दप्तरी उपलब्ध आहे. तरी अनुपालन मान्य होऊन परिच्छेद स्विकृत होणेस विनंती.

**(१२) परिच्छेद क्रमांक ४.३४७/१४ (सन २००८-०९)**

**पंचायत समित्यांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखा परिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमांचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गाभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जि.प. विभाग व पं.स. यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायत राज संस्थांच्या निर्देशनास येत आहे. उदाहरणादाखल पं.स. यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहे.

| अ.क्र. | जिल्ह्यांचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १३ | धुळे | साक्री | ४० (अ) | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

साक्री गटातील सन १९८८/८९ व २००६/०७ अखेर अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध न झालेले एकुण ७५ ग्रामपंचायतीचे २४६ घटकांचे लेखापरिक्षण न झाल्याने प्रलंबित आहेत त्यांची सद्यस्थितीत खालील प्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **तपशिल** | **ग्रा.पं. संख्या** | **घटक संख्या** | **ग्रा.से. संख्या** |
|---|---|---|---|---|
| (१) | लेखापरिक्षण बाकी असलेल्या एकूण ग्रामपंचायती | २९ | १४७ | २३ |
| (२) | लेखापरिक्षणस अभिलेचो उपलब्ध असलेल्या ग्रामपंचायती व घटक | ११ | ३२ | १५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (३) | लेखापरिक्षण झालेले ग्रामपंचायती व घटक | १५ | ४३ | २२ |
| (४) | बडतर्फ करण्यात आलेले ग्रा.से. व ग्रामपंचायतींचे घटक | ३ | ५ | १ |
| ५) | मयत झाल्याने लेखापरिक्षण न झालेले | १५ | १५ | १३ |
| (६) | चौकशी कामी पोलीसात /न्यायालयात अभिलेखे जमा असलेल्या ग्रामपंचायती व घटक | २ | ४ | १ |
| | **एकूण** | **७५** | **२४६** | |

वरीलप्रमाणे अ.क्र. १ अन्वये २९ ग्रामपंचायतीचे १४७ घटकांचे प्रलंबित लेखापरिक्षणास २३ ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी हे जबाबदार असल्याने त्यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या असुन त्याचेविरुध्द रु. २५०००/- दंडाची कारवाई सुरु आहे. तसेच लेखापरिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करण्याची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अ.क्र.२ मधील ११ ग्रामपंचायतीचे ३२ घटकांचे लेखापरिक्षण कार्यक्रम लावणेसाठी मा.सहा संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षा, धुळे यांना कळविण्यात आले आहे. कृपया खुलासा मान्य होणेस विनंती.

**(१३) परिच्छेद क्रमांक ४.३४७/१५ (सन २००८-०९)**

**पंचायत समित्यांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखा परिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमांचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गाभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जि.प. विभाग व पं.स. यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायत राज संस्थांच्या निर्देशनास येत आहे. उदाहरणादाखल पं.स. यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती शिंदखेडाकडील सन २००८-०९ अखेर प्रलंबित अग्रीमांपैकी वसूल झालेल्या रक्कमाची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| अग्रीमाचा प्रकार | दिनांक ३१ मार्च, २००८-०९ | २००८-०९ ते १५-१६ अखेर वसुली | निलंबित केलेल्या रक्कमा | जाने १७ अखेर वसूल केलेले अग्रिम रक्कम | येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|
| धान्य | १२४९९६ | ३९३५ | ३६७४६ | ८४३१५ | ० |
| वेतन | ५०४८९ | १४५५ | ५९५४ | ४३०८० | ० |
| प्रवास | १६१७४६ | १५७९३ | २३९५५ | २३२९९८ | ० |
| सन | ७६५९९ | ४५४१ | ४०९७९ | ३१०७९ | ० |
| प्राथमिक शिक्षक अग्रीम (सन) | ९४१४२ | ० | ० | ९४१४२ | ० |
| इतर अग्रीम | १८३२३४ | ७०,००० | ४४१८ | १०८८१६ | ० |
| एकुण | ६९१५६६ | ९५७२४ | ११२०५२ | ४८३४३० | ० |

जानेवारी, २०१७ अखेर प्रलंबित अग्रीमाच्या रक्कमा वसूल करण्यात आलेल्या आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामपंचायतीचे अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध न झाल्याने निकाली काढण्यात आलेल्या ग्रामपंचायत घटकांच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, सन २००८-०९ चे परिच्छेद क्रमांक ३.१०३७ (१३) चे स्पष्टीकरणमधील उत्तर व सन २०११-१२ च्या परिच्छेद क्रमांक ३.१२ चे उत्तर एकच आहे. ५६ ग्रामसेवकांनी ११३ ग्रामपंचायतीचे अभिलेख उपलब्ध करून दिले नाहीत, त्याबाबत त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू प्रकरणातील काही ग्रामसेवक मयत झाले आहेत.

तद्‌नंतर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, धुळे जिल्ह्यामध्ये एकूण ३१९ ग्रामपंचायती आहेत त्यापैकी ९७ ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण झाले असून मयत झालेल्या ग्रामसेवकांकडील ग्रामपंचायतीची संख्या ७१ आहे. ११३ प्रकरणात अभिलेखे उपलब्ध झाले नसून त्या ग्रामपंचायतींची संख्या ६५ आहे. ६५ ग्रामपंचायतीमध्ये ५६ ग्रामसेवक कार्यरत होते. सदरहू ग्रामपंचायतींची आकडेवारी सन २०११-१२ मधील उक्त प्रकरणाची माहिती देताना क्रमाने पुढे करण्यात आली आहे. उक्त प्रकरणी सदरहू ५६ ग्रामसेवकांकडून १० लाख ९५ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. सदरहू १० लाख रुपये दंडाची रक्कम प्रत्येक ग्रामसेवकाकडून २५ हजार रुपये दंडाप्रमाणे आकारण्यात आली आहे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३०. मधील कलम ७ प्रमाणे ज्या ग्रामसेवकांनी अभिलेखे उपलब्ध करून दिली नाहीत त्यांच्याकडून दंड वसूल करण्यात येतो. त्यामध्ये सन २०११ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. जे अधिकारी / कर्मचारी लेखापरिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून देत नाहीत त्यांच्याकडून २५ हजार रुपये दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार ६५ ग्रामपंचायतीमधील ५६ ग्रामसेवकांच्या वेतनातून दंडाची रक्कम दरमहा वसूल करण्यात येत आहे. काही ग्रामपंचायतींचा लाखो रुपयांचा व्यवहार असतो व ग्रामसेवक ते अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करून देत नसतील तर त्याबाबत त्यांना केवळ २५ हजार रुपये दंडाची शास्ती केली तर त्यांना सहकार्य केले, असे म्हणण्यास वाव राहतो. म्हणून समितीने सांगितल्यानुसार पुन्हा एकदा सलोखा करण्यात येईल व संबंधितांविरुध्द फौजदारी स्वरुपाची व दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच, १ ते २ महिन्यांच्या कालावधीत लेखापरिक्षण करून घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

तद्नंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी सूचित केले की, जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली आहे की, एका ग्रामसेवकाला २५ हजार रुपये दंडाची शास्ती लेखापरिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध न करून दिल्याबाबत केली आहे. अनेक वेळा एका ग्रामसेवकाकडे ३ ते ४ ग्रामपंचायतीचा कार्यभार देण्यात आलेला असतो. ग्रामपंचायतीचे अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध न करून दिल्याबाबत शास्ती करताना ती प्रती ग्रामपंचायत २५ हजार रुपये दंड याप्रमाणे करण्याची तरतूद आहे, त्यानुसार कारवाई करावयास पाहिजे.

तद्नंतर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू बाब तपासण्यात येईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, संबंधित ग्रामसेवकांविरुद्ध नियम ७ नुसार कार्यवाही झाली पाहिजे. हा विषय दंडात्मक कारवाई पुरता ठेवता कामा नये. कारण लाखो रुपयांचा अपहार करायचा आणि दंड भरुन सुटायचे हे बरोबर नाही. तेव्हा दंडाव्यतिरिक्त इतर कारवाई देखील झाली पाहिजे. काही ग्रामसेवकांकडून दर महिन्याला एक हजार रुपये वसूल करण्यात येतात याचा अर्थ त्यांना सूट देत आहात. या प्रकरणी पूर्ण चौकशी करावी, संबंधितांची वेतनवाढ रोखावी तसेच त्यांच्याकडून २५ हजार रुपये देखील वसूल करावे. वकिलाची फी किती आहे याचा देखील विचार करावा. कारण वसुलीची रक्कम १० हजार रुपये असेल आणि वकिलाची फी ५० हजार रुपये असेल तर त्याचादेखील विचार केला पाहिजे. शेवटी आपणास शासनाचे पैसे वसूल करावयाचे आहेत. त्याप्रमाणे योग्य ती कारवाई करून त्याचा अहवाल समितीला पाठवावा. कारवाई हा भाग वेगळा आहे. आपणास त्यांच्याकडून पैसे वसूल करायचे आहेत.

हा मुद्दा वसुलीचा नाही. आक्षेप असा आहे की, अनेकवर्षे देऊन सुद्धा लेखे उपलब्ध करून दिलेले नाहीत म्हणून स्थानिक निधी लेखा परीक्षा विभागाकडून अहवाल निर्गमित करण्यात आले आहे व त्यानुसार सदरील घटक थकीत घटकामधून कायम स्वरुपी कमी करण्यात आला आहे. त्यावर मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई यांचेकडील कार्यालयीन आदेश क्रमांक १४, दिनांक १९ एप्रिल २०१० आणि सह मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक यांनी आदेश क्रमांक ९० खाली प्रलंबित घटकांचे लेखापरीक्षण करणेबाबत सूचित केले आहे. अभिलेखे उपलब्ध करून त्याचे लेखापरीक्षण झाले पाहिजे पुढे असे नमूद केलेले आहे की, सन २००७-०८ ते २००९-१० या कालावधीतील ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षण दरम्यान आदेश क्रमांक ९० खाली निकाली काढण्यात आलेल्या घटकांचे अभिलेखे उपलब्ध करण्यासाठी सरपंच/ ग्रामसेवक यांना आगाऊ सूचना पत्रे निर्गमित करून देखील अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाही, म्हणून हा आक्षेप आहे. लेखी स्पष्टकरणामध्ये नमूद केलेले आहे की, गट विकास अधिकारी धुळे, साक्री, शिंदखेडा व शिरपूर यांना दिनांक २९ मार्च, २०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. हे उत्तर दिशाभूल करणारे आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणामध्ये किती ग्रामसेवक आहेत आणि आता ते कुठे कार्यरत आहेत याची माहिती घेऊन त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल. यानंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी असे सूचित केले की, ही सर्व जुनी प्रकरणे आहेत. अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाही म्हणून लेखापरीक्षण करता आले नाही. आता लेखे उपलब्ध करून देतो असे म्हणत असलात तरी त्या लेख्यांचे लगेच लेखापरीक्षण करणे शक्य होणार नाही. स्थानिक निधी लेखा विभागाला जसा वेळ मिळेल त्याप्रमाणे लेखापरीक्षण करून देण्यात येईल. लेखे का उपलब्ध होत नाहीत याचे कारण पाहिले तर लेखे लिहिलेले नसतात. विस्तार अधिकारी जेव्हा भेटी देतात त्यावेळी त्यांनी रोकड वहीवर तसे शेरे मारले पाहिजेत. विस्तार अधिकारी व गट विकास अधिकारी नियमित भेटी देतात पण लेखे तपासत नाहीत. त्यामुळे अपूर्ण राहतात. त्यामुळे लेखे लिहिले जात नाहीत. लेखे लिहिलेले नसतात हा महत्त्वाचा भाग आहे आणि अभिलेखे उपलब्ध करून दिले तरी विस्तार अधिकारी यांनी त्यांना वेळ मिळेल तसे लेखा परिक्षण करून घ्यावे. कारण स्थानिक निधी लेखा विभागाला देखील शासनाने दिलेल्या लक्ष्याप्रमाणे काम करावे लागते. तेव्हा विस्तार अधिकाऱ्यांनी ते लेखा परिक्षण करावे अशा आपण सूचना द्याव्यात. नियमित तपासण्या होत नाहीत हे लक्षात आलेले आहे. त्यामुळे लेखे उपलब्ध होत नाहीत.

यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, अभिलेखे उपलब्ध करून न देणे हा एक गुन्हा आहे. अभिलेखे उपलब्ध होणे महत्वाचे आहे. अभिलेखे उपलब्ध करून दिल्यानंतर घोटाळा उघड होईल तो नंतरचा भाग आहे. ज्यांनी अभिलेखे गहाळ केले असतील त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात येईल असे जिल्हा परिषदेकडून उत्तर अपेक्षित आहे. हे सर्व जुनी अभिलेखे

आहेत. लेखापरीक्षणाच्या वेळी अभिलेखे दाखविणे आवश्यक होते. अभिलेखे न दाखविल्यामुळे त्याचे लेखापरीक्षण करता आले नाही. ज्यांच्यावर हे अभिलेखे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी होती त्यांच्याकडून अभिलेखे उपलब्ध होत नसतील तर त्यांच्यावर फौजदारी कारवाई करावी. ज्यांनी हे अभिलेखे वेळेत सादर केले नाहीत त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी. सन २०११ च्या पूर्वीची प्रकरणे असतील तर १०० रुपये दंड आकारावा आणि त्यानंतरची प्रकरणे असतील तर २५ हजार रुपये दंड आकारावा. संबंधितांची तात्पुरती वेतनवाढ रोखावी व त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये नोंद घ्यावी असा समितीने निर्णय दिलेला आहे. तसेच हे अभिलेखे पुन्हा लेखापरीक्षणास सादर करावे. त्यामध्ये गंभीर बाबी आढळल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठवावा.

परिच्छेद क्रमांक ३.५८३/१ जि.प.उपकरांतर्गत राखून ठेवलेल्या २० टक्के निधीतून मागासवर्गीय शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर ताडपत्री पुरवण्यामध्ये झालेली अनियमिततेप्रकरणी समितीने विचारणा केली की, प्रशासकीय मंजुरी व तांत्रिक मंजुरी लेखापरीक्षणाच्यावेळी उपलब्ध करून न देण्याची कारणे काय आहेत, लाभार्थ्यांची मुख्य नोंदवही लेखापरीक्षणाच्यावेळी उपलब्ध न करण्याची कारणे काय आहेत, एकूण किती लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला, त्यापैकी किती लाभार्थी दारिद्य रेषेखालील होते, शिल्लक राहिलेल्या ३५ ताडपत्रीचे वाटप केव्हा करण्यात आले, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणात प्रशासकीय व तांत्रिक मान्यता सन २०११ मध्ये तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेली आहे. सदर प्रशासकीय मंजुरी आदेश नस्तीमध्ये उपलब्ध आहेत. परंतु लेखापरीक्षणाच्यावेळी ते उपलब्ध करून देण्यात आले नव्हते.

या प्रकरणातील सर्व कागदपत्र उपलब्ध असताना देखील त्यावेळी लेखापरीक्षणाला उपलब्ध करून देण्यात आले नव्हते ही वस्तुस्थिती आहे. शिल्लक राहिलेल्या सर्व ताडपत्री १०० टक्के अनुदानावर नंतर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत, यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०११-२०१२ वर्षात खरेदी करण्यात आलेल्या ताडपत्रीचे वाटप सन २०१२-२०१३ मध्ये सर्व लाभार्थ्यांना करण्यात आलेले आहे. मागासवर्गीयांसाठी दर वर्षी २० टक्के रक्कम खर्ची पडत असते, त्यामुळे नंतरच्या वर्षी ही २० टक्के रक्कम मागासवर्गीयांसाठी खर्ची पडली आहे.

तद्नंतर समितीने सूचित केले की, लेखापरीक्षणासाठी ऑडीटर आपल्याला ३ वेळा संधी देत असतात. आपल्याला ३ वेळा संधी दिलेली असताना देखील आपण लेखापरीक्षणाच्यावेळी माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे यापुढे तरी दक्षता घ्यावी.

परिच्छेद क्रमांक ४.२७२/०३/शिरपूर – पंचायत समिती उपकरांतर्गत राखून ठेवलेल्या २० टक्के निधीतून मागासवर्गीय लाभार्थ्यांना घरगुती वापरासाठी सौरकंदिल वाटप करणे योजनेच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचे आदेश कोणी व केव्हा दिले, लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही लेखापरीक्षणाच्यावेळी न दाखविण्याची कारणे काय आहेत, फलश्रुती अहवाल केव्हा तयार करण्यात आला, लेखापरीक्षणाच्यावेळी कागदपत्रे न दाखविल्याबद्दल २५ हजार रुपयांचा दंड आहे त्याप्रमाणे तो वसूल करण्यात यावा. तसेच त्यांची तात्पुरती वेतनवाढ रोखावी. यास तांत्रिक मान्यता कोणी दिली.

यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पंचायत समिती स्तरावर आदेश दिलेले आहेत. त्यानंतर पंचायत समिती, शिरपुर येथील गट विकास अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक १७ जून रोजी गीता सोलर सिस्टीम, एमआयडीसी,जळगाव यांना पुरवठा आदेश दिला होता. त्यांच्याकडून साहित्य घेतलेले आहे. एका नगाची किंमत ३२०० रुपये आहे. पुन्हा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पंचायत समितीचा दिनांक ३० जानेवारी २०१२ रोजीचा पुरवठा आदेश आहे. रेट कॉन्ट्रॅक्ट होते, यासंबंधातील कागदपत्र पुढील लेखा परीक्षणाच्या वेळी उपलब्ध करून दिली आहेत. पहिल्या लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्र उपलब्ध करून देण्याचे राहिले होते.

परिच्छेद क्रमांक ५.५०(३)/२/विरवेल (ता.शिंदखेडा) : ग्रामपंचायतीमधील इतर अनियमितता (अभिलेखे उपलब्ध नसणे) या संदर्भात समितीने विचारणा केली की, अभिलेखे उपलब्ध न केल्यास कोणती कारवाई करावी यासंबंधी समितीने यापूर्वीच निदेश

दिलेले आहेत. यासंबंधी दंडात्मक कारवाईची समितीने निदेश दिलेले आहेत. प्रकरणात गांभीर्य असेल तर लेखे ताबडतोब उपलब्ध करून देण्यात यावे, संबंधितांची चौकशी करून एक वेतनवाढ रोखण्यात यावी अशा प्रकारचे निदेश यापूर्वी समितीने दिलेले आहेत. तेव्हा या प्रकरणी देखील अशाच प्रकारची कारवाई करण्यात यावी, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर अभिलेखे पुढील लेखा परिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देण्यात आले असून त्याचे लेक्षा परीक्षण पूर्ण झालेले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, ज्यावेळी लेखा परीक्षण झाले त्यावेळी अभिलेख उपलब्ध करून देणे आवश्यक होते ते लेखापरिक्षणाच्या वेळी दाखविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे समितीने एक वेतनवाढ रोखण्याचे किंवा २५ हजार इतका दंड आकारण्यासंबंधीचे व त्याची नोंद गोपनीय अहवालामध्ये घेण्याचे निदेश यापूर्वीच दिलेले आहेत.

दुसरे असे की, आजच्या बैठकीसाठी तत्कालिन अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याबाबत कळविले असेल. त्यापैकी किती तत्कालीन अधिकारी उपस्थित आहेत व किती अनुपस्थित आहेत याचा संपूर्ण अहवाल समितीला सादर करावा.

परिच्छेद क्रमांक ३.६५/१/शिक्षण : ४ टक्के सादील अनुदानातुन डयुअेल डेक्स खरेदी मधील अनियमिततेप्रकरणी समितीने विचारणा केली की, १४ शाळांची दुरुस्ती पूर्ण झाली आहे काय, कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्ताव का पाठविण्यात आला, विलंबाने प्रस्ताव पाठविण्याची कारणे काय आहेत, लेखापरीक्षणावेळी बेंच पुरवठा कोणत्या शाळांना केला त्याचा अहवाल उपलब्ध करून न देण्याची कारणे काय आहेत, ज्यांनी लेखापरीक्षणासाठी कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत त्यांना आपण शोकॉज नोटीस दिलेली आहे काय ?

यावर प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खुलासा केला की, सदर अहवाल दप्तरी उपलब्ध आहे. त्यावेळी संबंधित कर्मचाऱ्याने किंवा शिक्षणाधिकाऱ्यांनी लेखापरीक्षणासाठी कागदपत्रे का उपलब्ध करून दिली नाहीत. तत्कालीन शिक्षणाधिकारी सेवानिवृत्त होऊन मयत झालेले आहेत. सदर नस्ती बघता असे आढळून येते की, सादील खर्चाच्या ३६ लक्ष रुपयांपैकी २० टक्के रक्कम जिल्हास्तरावर व ५० टक्के रक्कम वस्तुखरेदीसाठी खर्च करावयाची होती. यामध्ये ७.२० लक्ष रुपये बेंचसाठी खर्च करण्यात आलेले आहेत. ही सर्व खरेदी सन १९९४ च्या शास निर्णयानुसार झालेली असून सन २००१ पासून सर्व शिक्षा अभियान लागू झाले असून सर्व शिक्षा अभियानात शाळा दुरुस्तीसाठी निधी येत असतो. सन २००८-२००९ या वर्षात १६.७ लक्ष रुपये निधी प्राप्त झाला होता. यामध्ये त्यांनी निम्म्या रक्कमेची खरेदी करावयास पाहिजे होती. परंतु त्यांनी पूर्ण रक्कम बेंचसाठी खर्च केलेली आहे. यामध्ये १४ शाळांची दुरुस्तीची मागणी होती. या खरेदीला शिक्षण समिती व स्थायी समितीने परवानगी दिली होती व यामध्ये १४.१५ लक्ष रुपये दुरुस्तीवर खर्च झालेले आहेत. याप्रकरणामध्ये अपहार झालेला नाही.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सन २००८-०९ व सन २०११-१२ या अहवाल वर्षात लेखापरिक्षणास कागदपत्र उपलब्ध करून दिले नसल्याप्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर समितीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार दंडाची व एक वेतनवाढ रोखून तशी सेवा पुस्तिकेमध्ये नोंद घेण्याची कारवाई केली आहे काय, त्यानुसार प्रकरण व परिच्छेद निहाय दोन्ही अहवाल वर्षाची माहिती समितीस सादर केली आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय ?

(२) भविष्यात लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न करून देणे असे आक्षेप वारंवार उपस्थित होऊ नयेत याबाबत काटेकोर अंमलबजावणी करण्यासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) सन २००८-०९ व सन २०११-१२ या अहवाल वर्षात लेखापरिक्षणास कागदपत्र उपलब्ध करून दिले नसल्याप्रकरणी संबधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर समितीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० च्या कलम ७ अनुसार रुपये २५,०००/- प्रमाणे रुपये ११,०६,०००/- दंड वसूल करण्यात आला असून लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध न करणाऱ्या ४२ ग्रामसेवकांच्या दोन वेतनवाढी तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आल्या आहेत. तसेच सेवापुस्तिकेमध्ये नोंद घेण्याची कारवाई केली आहे. सोबत यादी जोडली आहे. (परिशिष्ट "अ")

**परिच्छेद क्रमांक ४.२७२/०३/शिरपुर-पंचायत समिती उपकरांतर्गत राखून ठेवलेल्या २० टक्के निधीतून मागासवर्गीय लाभार्थ्यांना घरगुती वापरासाठी सौरकंदील वाटप करणे योजनेतील अनियमितता :-**

प्रशासकीय मान्यतेचे आदेश दिनांक १९/११/२०११ व तांत्रिक मान्यता आदेश दिनांक २१/११/२०११ रोजी गटविकास अधिकारी पंचायत समिती, शिरपुर यांनी दिलेले आहे.

मास्टर नोंदवही सन २०१२-१३ च्या पुढील लेखापरिक्षणाच्यावेळी दाखविण्यात आली आहे.

/फलश्रुती अहवाल सन २०११-१२ या आर्थिक वर्षात लाभार्थ्यांना लाभ वितरीत झाल्यानंतर १३/०८/२०१२ रोजी सादर करण्यात आला आहे.

लेखापरिक्षणाच्या वेळी कागदपत्रे न दाखविण्याबद्दल तत्कालिन कनिष्ठ सहाय्यक यांच्यावर रक्कम रुपये २५०००/- दंडाची व तात्पुरती वेतन वाढ बंद करण्याची कार्यवाही या कार्यालयातील आदेश क्रमांक पंसशि/सकवि/१४०/२०१८ शिरपुर दिनांक २८/३/२०१८ अन्वये करण्यात आली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.५८३** – जिल्हा परिषद उपकरांतून राखून ठेवलेल्या २० टक्के निधीतून मागासवर्गीय शेतकऱ्यांसाठी १०० टक्के अनुदानातून ताडपत्री पुरविण्यामध्ये झालेली अनियमितता याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.६५/शिक्षण – ४ टक्के सादिल अनुदानातून डयुअेल डेक्स खरेदी मधील अनियमितता**

उपरोक्त मुद्यांबाबत सखोल चौकशी करण्यात आली असून तत्कालिन सहाय्यक श्री. पी.डी.भामरे यांचेकडून रुपये १००/- चा दंड आकारुन दिनांक ३/४/२०१८ चलन क्र.५६६६४२२ ने भरणा करण्यात आलेला आहे.

श्री. पी.डी.भामरे हे दिनांक ३१/५/२०१३ रोजी सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांची वेतनवाढ रोखण्याची कारवाई केलेली नाही.

**परिच्छेद क्रमांक ४.१६८ प्राथमिक आरोग्य केंद्र, दुसाणे येथील लेख्यांबाबत :-**

प्राथमिक आरोग्य केंद्र, दुसाणे ता.साक्री येथील तत्कालिन कनिष्ठ सहाय्यक श्री. व्ही.बी.पाटील सद्या वरिष्ठ सहाय्यक शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद, धुळे यांना पंचायत समिती साक्रीचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पंरासा/आस्था/२३६४/२०१६ साक्री दिनांक ३१/१२/२०१६ अन्वये बजाविण्यात आली होती. त्यानुसार श्री. पाटील यांचा दिनांक ९/२/२०१७ रोजी लेखी खुलासा प्राप्त झाला असून सदर खुलासा अमान्य करून श्री. पाटील यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चे उल्लंघन केलेले आहे, म्हणून महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील तरतुदींनुसार पंचायत समिती साक्रीकडील आदेश क्रमांक पंरासा/आस्था/पंरास प्रमु/५१३/२०१७ साक्री दिनांक २४/३/२०१७ अन्वये श्री. पाटील यांचेवर ठपका ठेवण्यात आला आहे.

सदर शिक्षेविरूद्ध श्री. पाटील यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, धुळे यांचेकडे अपील केले व त्यानुसार उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, धुळे यांचेकडील आदेश क्र.साप्रवि/आस्था-२अ/इएमपी/अपील/१/२०४/२०१७ धुळे दिनांक २/११/२०१७ अन्वये श्री. पाटील यांचे अपील मान्य करून पंचायत समिती, साक्री कडील दिनांक २४/३/२०१७ चा आदेश रद्द केला आहे.

सदरचा आक्षेप सन २००८-०९ मधील असल्याने तत्कालिन जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेकडून दंडात्मक कार्यवाही म्हणून रुपये १००/- चलन क्रमांक १२३७६९ दिनांक ७/२/२०१८ रोजी रोख स्वरुपांत वसूल करून शासन सदरी भरणा केला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

१) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासनाची सहमती आहे.

२) पंचायती राज समितीच्या ८ व्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा संहिता अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सुधारणा करण्यासाठीच कार्यवाही वित्त विभागाकडून होणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा संहिता अधिनियम १९३० च्या कलम ७ मध्ये रुपये २५०००/- दंडाऐवजी रुपये ५०,०००/- किंवा ज्या कामाचे अभिलेख दर्शविले नाहीत त्या कामाच्या ५ टक्के यापैकी जी रक्कम अधिक आहे ती दंड म्हणून आकारण्यात यावी तशी सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडून दिनांक ५/७/२०१८ च्या पत्रान्वये वित्त विभाग व संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना पाठविण्यात आला आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने धुळे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १५ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने उपरोक्त परिच्छेदासंदर्भात लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्याप्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या संदर्भात जिल्हा परिषदेने कार्यवाही केली आहे तसेच हा मुद्दा प्रत्येक पंचायत समितीच्या दौऱ्यात उपस्थित होत असतो. समितीने यासंबंधी निदेश दिले होते. याबाबत वित्त विभागाकडे नस्ती पाठविली आहे. त्यात असे नमूद केले आहे की, ५० हजार रुपये किंवा एकूण कामाच्या ५ टक्के यापेक्षा जी रक्कम जास्त असेल ती रक्कम दंड म्हणून आकारण्यात यावी.

यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर प्रकरणी कारवाई केली असून त्याबाबत संबंधितांकडून वसुली केली आहे. तसेच संबंधितांच्या २ वेतनवाढ थांबविल्या आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २००७-०८ ते सन २००९-१० व त्यासोबत सन २००६-२००७ पर्यंतच्या प्रलंबित लेखा परिक्षणास मंजूरी देण्यात आली, त्यानुसार सन २००८-०९ तसेच सन २०११-१२ मधील एकूण १२ परिच्छेदांमध्ये लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आले नसल्याचे दिसून आले. त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्याप्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार सन २००८-०९ मधील प्रकरणांसंदर्भात रुपये १००/- आणि सन २०११-१२ मधील प्रकरणांसंदर्भात वित्त विभागाने या अधिनियमात केलेल्या सुधारणेनुसार महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५०००/- इतकी दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्याची शिफारस करून देखील काही अधिकारी या नियमास न जुमानता लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत.

राज्यात अनेक ठिकाणी भेटी देत असताना समितीच्या असे निदर्शनास आले की, लेखा परिक्षकांना अभिलेखे संबंधित अधिकाऱ्यांकडून वेळीच उपलब्ध करून दिली जात नाहीत. त्यामुळे लेखापरिक्षण करता येत नाही. या बाबींचा गैर फायदा

संबंधितांकडून घेतला जातो हे टाळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या दंडात्मक तरतुदीत बदल करणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता आता समिती अशी शिफारस करीत आहे की, "**जी कोणतीही व्यक्ती महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ६ पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये कायदेशीररित्या तिला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करेल किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल ती विभागीय आयुक्तांपुढे सदर बाब सिध्द झाल्यानंतर लेखा परिक्षणास उपलब्ध न झालेले दस्तऐवज/अभिलेख यामध्ये गुंतलेल्या एकूण रक्कमेच्या ५% किंवा रुपये ५०,००० यापैकी जास्त असणाऱ्या रक्कमे इतक्या दंडात्मक रकमेस पात्र ठरविण्यात यावी. तसेच त्यांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तकामध्ये घेण्याची कारवाई करण्यात यावी**" अशी सुधारणा संबंधित अधिनियमात करण्यात यावी व करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला कळविण्यात यावी.

